श्रीनटेश प्रसन्न.

अणणासाहेबांची धांदल!

"The Arabian Night"

नामक एका इंग्रजी फार्साच्या आधारानें हें प्रहसन

अनंत वामन बरवे

यांनीं लिहिलें त्याची,

दुसरी आवृत्ति

रामचंद्र दत्तात्रय फाटक

यांनीं छापून प्रसिद्ध केली.

सन १९१०.

किंमत चार आणे.

हें पुस्तक नं. ४३४ ठाकुरद्वार रोड मुंबई, येथें 'इंदुविजय' कंप
'इंदुप्रकाश' छापखान्यांत दामोदर सांवळाराम यंदे यांनीं मालकाकरितां छ

॥ श्रीनटेशप्रसन्न ॥

अण्णासाहेबांची धांदल !

(सकाळची वेळ–अण्णासाहेबांचा दिवाणखाना–धोंडिबा गडी कांहीं साफसुफ करीत आहे, इतक्यांत एका दारांतून काशी येते.)

काशीः—(एका टेबलाजवळ जाऊन) धोंडीबा, मला जरा हात लाव बरं ?

धोंडिबाः—तुला हात लावूं ! नगरे बा ! त्या दिसची मला पक्की सय हाय कीं; मी गमतीनं तुला हात लावाया ग्येलों, आन् तूं अशीच मांजरीवानी खसकन् माज्यावर वराडलीस!—आज का फिरून काकूबाईनीं हें पाह्यलं, तर आता बरीक मला हतन काढूनच लावत्याल.

काशीः—पर माज्या अंगाला तूं हात लावूंच नकोस; मी कुठं म्हणत्येंय्; मला नुसतं उचलूं लाग झांजी झालं.

धोंडिबाः—ह्ये पा कसं उफराटं त्ये; ह्मण मला उचलूं लाग आन् आंगाला हात लावूं नग. हात लावल्याबिगर तुला उचलतां ग कसं यावं ? आं ?

काशीः—मेल्या मला उचलायला नाहीं सांगत, अरे धरूं लाग ह्मणत्यें.

धोंडिबाः—पुन्हाबी त्येंच; हात लावूं नग म्हण उचलूं लाग, आन् उचलूं नग, तर म्हणं धरूं लाग.

काशीः—कितीरे हेंगाडा आहेस तूं; हें चहाचं टेबल इथून उचलून न्यायाचं आहे तें नेऊं लाग; आतां तरी समजलास ?

धोंडिबाः—अस्सं व्हय ! अग पर अन्नासाब आतां उठत्याल त्येना चहा प्येयूचाय, नव्हका ?

काशी:—काकूंनीं सांगितलंय आतां नको त्यांना चहा; ते धा–धा वाजत तोंपौत निजून राहूं लागल, तर तितका वेळ चहा ठेवायचा कीं काय ?

धोंडिबा:—हां, कसा हाये पधितलास सासूचा धाक ह्यो ! गरीब बिचार अन्नासाब ! तुजी आई मेलीया बरं झाल; मी मोठा भाग्याचा; न्हाइतर तुझा माझा मेतूर लागल्यावर मलाबी अन्नासाहेबावानी तिच्या धाकांत रहावं लागतं अक्षी.

काशी:—परं कारे धोंडिबा, तूं मला ह्योतराचा निसता नाद लावून ठेवणारसा दिसतोय ! तुजी कांहींबी तयारी नाहीं.

धोंडिबा—व्हतेय् कशी ? जरा पैकातर जमाया होवा ? माज्या ह्योतराच्या या रानीसंग चार दिस असं खुषमौजेंत घालाया नग का ?–कसं कसं?–(जवळ जाऊन हनुवटीस हात लावतो, ती मुरका मारून दूर होते. तों काकू येतात. त्यांनां पाहून दोघें आपआपल्या कामास लागतात.)

काकू:—काशी, काशी, अजून तें टेबल उचलून नेलं नाहींसना ! धन्य आहे बाई तुझी.

काशी:—मला एकलीला तें न्येतां येईना काकू.

काकू:—आहा, मोठं जड पडलं किनई ? (वेडावून) म्हणे नेतां येइना काकू !

काशी:—तसं नव्ह; त्येच्यावर चहादाणी, ह्ये कौप बशा, गलास हैती; आल्हाद उचलून न्याया हवं.

काकू:—मग धोंडी काय करतो आहे ?

धोंडी:—अन्नासाबांचा कोट साफ करतोया, नव्हका ह्यो.

काकू:—आण तो इकडे आणि जा तें टेबल घेऊन. (तीं दोघें टेबल घेऊन जातात. काकू कोट चाचपून पहातात.) खिशांत कांहीं नाहीं !

ठेवताहेत कशाला; सासू झालें तरी मी परकीच कीं नाहीं. माझा विश्वास आपला तितकाच असायचा–हें पण काय बरं ! अं:, आगपेटी:—

(अण्णासाहेब आपल्या निजावयाच्या खोलींतून बाहेर येतात .)

अण्णा:—आणा ती इकडे.

काकू:—हो, त्याकरितांच तर काढली मी ! म्हटलं उगाच इकडे तिकडे शोधाल. टेबलावर ठेवणारच होत्यें.

अण्णा:—(स्वगत) कोटाचे सारे खिसे चांचपून पाहिलेसे दिसतात.

काकू:—पुरुषांचा स्वभाव असतो विसरभोळा; बरं पण हें एक पत्र आलें आहे आत्तां.

अण्णा:—पत्र ! कुणाचं बरं ? (पत्र घेतो).

काकू:—कोणाचं म्हणजे ? फोडून पाहिल्याशिवाय मीं कसं समजायचं हें ! पण तुम्ही असे गोंधळलांत तें ? काय पाहतां ?

अण्णा:—कांहीं नाहीं. (पत्र पहात) पोष्टाचा छाप रत्नागिरीचा आहे. तिथल्या फीमेल बोर्डिंग स्कूलच्या व्यवस्थापिकेचं पत्र दिसतं आहे.

काकू:—पण अण्णासाहेब, तुमची पांघरायची शाल हो इथं दिसत नाहीं ती ?

अण्णा:—(स्वगत) आलंच लक्षांत, त्या कुठच्या विसरायला. (उघड) माझी शाल नेहमीं इकडे तिकडे अशीच पडते. असेल येथंच कुठें.

काकू:—इथं कुठं नाहीं. काल रात्रीं तुम्हीं ती पांघरून बाहेर जातांना मीं पाहिलं; मला पक्कं आठवतंय.

अण्णा:—(स्वगत) या सारं पक्कंच ध्यानांत ठेवीत असतात !

काकू:—काय बरं झालं असावं तिचं ?

अण्णा:—असेल कुठंतरी पडली. मिळेल पुन्हां.

काकू:—होय ! कुणा चांगल्याच्या हातीं लागली असेल तर मिळेल पुन्हा; कारण तिच्यावर तुमचं नांव न घराचापत्ता सुद्धां आहे.

अण्णा:—(चपापून) हं, कुणाचा बरं उद्योग हा !

काकू:—कुणाचा ह्मणजे ? माझा. रमा मला जातांना बजावून गेली आहे. तेव्हां ती येईपर्यंत घरांत विशेष रीतीनं जपलं टपलं पाहिजेच मला.

अण्णा:—(स्वगत) जपण्याचं असो, पण खिशांतल्या पैशाआडक्यावर विशेष मात्र टपलेल्या असतात खऱ्या !

काकू:—ती गेल्यावर पहिली गोष्ट काळजीपूर्वक मीं केली ती ही कीं, तुमच्या वापरण्यांतल्या ह्मणून जेवढ्या मोलवान् जिनसा त्यावर तुमचं नांव व पत्ता लिहवून ठेवला—हो न जाणो, जिन्नस कुठं कांहीं सांडला, किंवा वाटेंत तुह्मालाच कांहीं अपघात झाला.

अण्णा:—काय म्हटलंत, अपघात झाला ?

काकू:—हो, त्याचा काय नेम ! ही मुंबई आहे. मेली गाड्यान् घोड्याची गर्दी कोण असते रस्त्यांत. त्या साइकळी, मोटारी, ट्रामवेली म्हंजे जशी भुतावळी धांवत असतात इकडून तिकडे. त्यांच्या सपाट्यांतून घरीं परत आलं म्हंजे पुनर्जन्मच तो !—म्हणून म्हणत्ये वाटेनं कांहीं अपघात झाला, तर ओळखण्याची पंचाईत पडूं नये तुम्हाला !

अण्णा:—वाहवा ! काय काळजीची गोष्ट सांगावी !

काकू:—पण तें पत्र अद्याप पाहिलं नाहींतच आपण.

अण्णा:—खरंच (वाचूं लागतो)—

"लेडी सुपरिंटेंडेंट फीमेल बोर्डिंग हाऊस् रत्नागिरी यांजकडून-सलाम दिगर. कालपासून आमच्या बोर्डिंगस्कूलला 'मे' महिन्याचो सुट्टी झाली आहे. त्यामुळें सर्व विद्यार्थिनी आपापल्या गांवीं जात आहेत. आपली भाची चिरंजीवी कमळा ही आजच या बोटीनें येथून रवाना होईल, व

हें पत्र आणि ती एकदम आपलेकडे येऊन पोंचतील. सुखरूप पोंहच-ल्याचें कळविण्याची मेहरबानी व्हावी. तसदी माफ. कळावें."

काकूः—अगबाई; तरमग आतांच ती आली पाहिजे.

अण्णा:—होय.

काकू:—बरं झालं बाई. सहजच मग हा सबंध वैशाख महिना तिचा इथं मुक्काम होईल. अनायासानं आमच्या दृष्टीस तरी पडेल ती. आन् फारा दिसांचा हेतु आहे, त्याप्रमाणें माझ्या बाजीरावाबरोबर तिचं या खेपेला आपण आतां लग्नहि लावून टाकूं.

अण्णाः–पाहूं त्याचं. त्याबद्दल मी अजून पुरतासा विचार केला नाहीं.

काकूः—पण माझ्या बाजीरावाशीं तिचं टिप्पण जुळत असल्यास तुह्मीं त्यांत मग अडथळा आणणार नाहीं खास.

अण्णाः—पहातां येईल तें. बरं पण आज आमच्या चहाची इथं कांहीं तयारी नाहीं हें कसं?

काकूः—चहाची वेळ अजून राहिली आहे तरी का? तुम्हाला उठायला आज किती तरी वेळ झाला. बरं, रात्रीं इतका वेळ कुठं जाऊन बसलां होतां, सांगा पाहूं.

अण्णाः—(स्वगत) झाला आमच्या तपासणीला आरंभ.

काकूः–सांगण्यासारखं नसलं तर राहिलं बापडं. मी कशाला विचारूं बाई!

अण्णाः—तसं कांहीं नाहीं, काल कांहीं फार उशीर झाला नाहीं.

काकू:—फार नाहीं तर कायहो झालं. कडी काढण्यासाठीं केवढा वेळची स्वतः मी जागत बसल्यें होत्यें. तरी रमा जातांना मला म्हणालीच, कीं मी आतां घरीं नाहीं तेव्हां रात्रभर फिरायला मोकळीक झाली. मी काय करणार याला; किती जपणार टपणार झाल्यें तरी बायको ती बायको, आणि सासू ती सासू. येईलच म्हणा आतां ती लवकर, आन् ती आली ह्मणजे मी सुटल्यें.

अण्णाः—कां ? जाणार कां आपण इथून ?

काकूः—होच. रमा आल्यावर मला इथं राहून काय करायचं आहे ? माझा बाजीराव आन् मी जाऊं आपल्या गांवीं.

अण्णाः—ती आल्यानंतरच ना ?

काकूः—पण रमाला यायला फार अवकाश नाहीं; ही आजचीच आतां वाट आहे.

अण्णाः—हं ! कशावरून ?

काकूः—काल शेजारचीं माणसं पुण्याहून इथं आलीं. त्यांच्याबरोबर निरोप आला कीं, ती कालच रात्रीं पुण्याहून निघून एव्हांना यायची सुद्धां. वाटच पहात्येंय् मी तिची.

अण्णाः—असं, ठीक आहे; येऊं द्या.

काकूः—कां बरं ? रमा येणार ह्मणून तुम्हाला आनंद झाल्याचा दिसत नाहीं.

अण्णाः—वः ! बायकोबद्दल आनंद कसा नाहीं वाटणार; ती आल्यानं माझ्या मागची आतां–

काकूः—सासूची कटकट टळेल हेंच ना ?

अण्णाः—छे, छे ! ह्मटलं–घरांतली एकलकोंडी स्थिति टळेल.

काकूः—त्याला बरीक माझा नाइलाज आहे,

(धोंडिबा येतो.)

धोंडीः—अन्नासाब, भाईरकुनी गिरस्त आलाया.

(नांवाची कार्ड देतो.)

अण्णाः—(कार्ड वाचोत) रामराव देशपांडे, ओहो ! जुना कॉलेजांतला मित्र; आहे आपला भटकभाई सडकसीताराम ! फार दिवसांनीं भेटतो आहे बुवा.

काकू:—येऊं द्या मग त्यांना आंत.

अण्णा:—पण मला वाटतं आज कमळा वगैरे मंडळी येणार, तेव्हां तुह्मांला घरांतली पुष्कळ व्यवस्था पहायची असेल.

काकू:—समजल्यें मी. कालिजांत असतांना स्वच्छंदपणानं केलेल्या तुमच्या आतां गोष्टी चालायच्या असतील, तेव्हां अशा वेळीं माझी अड-चणच ह्मणायची. जात्यें मी.

(काकू जातात—रामराव येतो.)

अण्णा:—या तुह्मी चैनी !

रामराव:—कसं काय बोवा संसारी ! अरे पण प्रापंचिकपणाचा कांहींच परिणाम तुजवर झालेला दिसत नाहीं.

अण्णा:—हां. तोरे काय ?

रामराव:—प्रपंची माणूस ह्मटला ह्मणजे संसाराच्या दगदगीनं अगदीं त्रासलेला, खंगलेला, आंबलेला, आणि एखाद्या भारवाही जनावराप्रमाणें आयुष्याचे दिवस केवळ काबाडकष्टामध्यें कसे तरी कंठतो आहे असा दिसणारा असायचा ! पण तूं आपला पहावा तो अजून पहिल्यासारखाच शांत, धिम्मा, आनंदी आहेस.

अण्णा:—आणि तूं पण तसाच चैनी व रंगेल आहेस. कायरे लग्न करून संसारी होणार आहेस तरी कधीं ?

रामराव:—आधीं संसारसुखाबद्दलचा ह्मटलं आमच्या मित्राचा अनुभव प्रत्यक्ष पाहूं, आणि मग जर हेवा उत्पन्न झाला, तर आपणही तें सुख मिळवायच्या खटपटींत पडूं.

अण्णा:—मग माझा जर अनुभव विचारशील तर माझं संसारसुख कांहीं तितका हेवा उत्पन्न करण्यासारखं तुला आढळणार नाहीं, खास !

रामराव:—कां बरं रे ?

अण्णाः—अरे बाबा, लग्न करून मी बायकोच एकटी घरांत आणली नाहीं; तर तिच्यासाठीं मग तिची आई आणली, आईच्यासाठीं एक ऐदी व ऐतखाऊ असा तिचा भाऊही आणला, भावाबरोबर त्याचीं कुतरीं, मांजरं, माकडं आणि गांवांतले त्याचे पाजी उनाड असे सोबतीही आणले–

रामरावः—ह्मणजे ? सगळे इथं हे तुझ्या घरीं रहायला आले आहेत, वाटतं !

अण्णाः—आले आहेत कसले, रोज जायाला निघतात; पण लग्न झाल्यापासून जे घुसले आहेत, ते एकदांही इथून कधीं गेले नाहींत ! असो जाऊं दे. बरं तुझं कसं चाललं आहे ? अजून तूं आपला स्वतंत्र वृत्तींत राहून चित्रकलेचा अभ्यास चालविला आहेसना ?

रामरावः—होय. आणि ईश्वरकृपेनें त्यांत माझी गतीही चांगली झाली आहे. नानाप्रकारचं सृष्टिसौंदर्य पहातां यावं म्हणून मी पुष्कळ दूर दूर प्रवास केला व त्यांत मला किफायत पुष्कळ झाली. अनेक संस्थानिकांकडून मला मोठमोठीं कामं मिळालीं व त्या योगानं लौकिक व संपत्ति या दोहोंचा मला लाभ झाला. नुकतंच भावलपूरच्या नबाबानं मला एक शहाजादीची तसबीर तयार करायला सांगितली आहे.

(एक मुलगा चहाचे दोन कप आणून ठेवून जातो.)

अण्णाः—काय म्हटलंस ? शहाजादीची तसबीर ?

रामरावः—होय. शहाजादीची. तूं कधीं 'अरेबियन् नाइट' हें पुस्तक वाचलं आहेस का ?

अण्णाः—'अरेबियन् नाईट' हें पुस्तक ? थांब, बरी गोष्ट काढलीस. मला एक गम्मतच तुला सांगायची आहे.

रामरावः—त्यांत बगदादच्या बादशहाची अत्यंत खुपसूरत अशी जी शहाजादी वर्णन केली आहे, तिची तसबीर मला तयार करायची आहे.

साधारणतः मी तिची आखणी केली आहे. पण चेहेऱ्यांत एक प्रकारचा लाडकेपणा आणण्यासाठीं मी त्या नमुन्याचा चेहेरा कोठें आढळेल काय म्हणून पहात हिंडत होतों. शेवटीं काल रात्रीं पुण्याच्या स्टेशनवर बायकांच्या डब्यांमध्यें त्या तोंडवळ्याची एक स्त्री आढळली. मी तशाही गर्दींत वारंवार गाडीशीं जाऊन चेहरा नीट ध्यानांत ठेवण्याचा व उतरूनही घेण्याचा प्रयत्न केला, पण तिला माझा संशय येऊन ती मजकडे पाहीनाशीच झाली. ती त्या गाडीनं मुंबईला यायला निघाली होती असं मला समजलं. तेव्हां मीही मुंबईचं तिकिट काढून त्याच गाडीनं निघालों. सकाळीं कल्याणच्या स्टेशनवर मी तिला पाहिली, पण पुढें तिची माझी चुकामूक झाली.

अण्णाः——राहूं दे तुझी ती गोष्ट. आतां माझी तर गम्मत ऐक. सध्यां आमचं कुटुंब गेलं आहे पुण्यास तिच्या मावशीकडे लग्नाला. मागं आमच्या तैनातीसाठीं म्हणा किंवा आमच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं म्हणा सासूबाई इथं राहिल्या आहेतच. त्यांच्या धाकानं आम्ही आमची रात्रीची वेळ बहुधां बाहेर कुठं क्लबांत किंवा नाटकालासुद्धां न जातां या खोलींत दार लावून घेऊन स्वस्थ पडण्यांत घालवितों. काल दुपारीं आमच्या मनांत तें 'आरेबियन् नाईट' पुस्तक घेऊन वाचावं असं आलं. त्यांत बगदादच्या बादशहाचीच गोष्ट निघाली. तो बादशहा नित्य रात्रीं वेषांतर करून गुप्तपणें आपल्या राज्यांत फिरत असे; आणि रंजल्यागांजल्या रयतेचा परामर्श तशा गुप्त रूपानं घेई. या त्याच्या कृत्याचं मोठं कौतुक वाटून आमच्याही मनांत आलं कीं, क्षणभर आपण आज बादशहा बनावं आणि गुप्तपणानं बाहेर असाच कोणावर कांहीं तरी प्रसाद करून यावं.

रामरावः——भले राजश्री, मग ?

अण्णाः——मग काय ? घरांत गंगावन होतं त्याची बनवली दाढी, शेले शाली काढून जमवला पोशाख. आणि सर्वांग झांकेल असा वरतून

हा टोगा घालून व कमरेला शाल बांधून गुप्तपणानं निघाली आमची स्वारी नगरसंचारार्थ ! रात्र काळोखी होती, त्यांत पावसाचं विशेष चिन्ह, त्यामुळं बॅकबेवर सुद्धां कोणी माणसं दिसत नव्हतीं. इतक्यांत समुद्रकांठच्या रस्त्यानं अंधेरांतून एक आकृती मागंपुढं पहात चाललेली दृष्टीस पडली. जवळ जाऊन पहातों तों ती एक तरुण मुलगी !

रामराव:—ठीक सुलतानसाहेब, बादशाही प्रसादाचा अनुग्रह करायला पात्रहि योग्यच सांपडलं आपल्याला हें !

अण्णा:—इतक्यांत वारा सुटून बारीक पाऊस पडायला सुरवात झाली. तेव्हां ती मुलगी रस्ता चुकली असावी व तिला कोणाच्या तरी मदतीची जरूरी आहे अशी आम्ही कल्पना करून एकदम पाठीमागं जाऊन तिला आपल्या छत्रींत घेतली; व तुला कुठं पोंचवूं ह्मणून मोठ्या सभ्यपणानं तिला विचारलं.

रामराव:—गैर रस्त्यांत सांपडलेल्या पोरीला सुध्या रस्त्याला लावून देण्याचं आपण हें बादशाहीच सत्कृत्य आरंभलं ह्मणायचं ! बरं पुढें ?

अण्णा:—तिला ग्रँटरोडचे बाजूला जायचं होतं; वाटेंत एक व्हिक्टोरिया करून आह्मी तींत बसलों व तिच्या घरापर्यंत जाऊन तिला पोंचविली. गाडींत तिनं मला थोडक्यांत हकीगत सांगितली, त्यावरून ती एक अनाथ बालिका असून ग्रँटरोडवरील एका नाटक कंपनींत नुकतीच राहिली आहे असं समजलं. ज्या घराशीं तिला पोंचविली तिथं तिचं स्वतंत्र बिऱ्हाड आहे. एकटीच एका खोलींत राहते.

रामराव:—मग आपण त्या खोलींत क्षणभर विश्रांति घेऊन घरीं आलां वाटतं.

अण्णा:—छत्—नॉन्सेन्स, भलतंच. शिवाय तिचा प्रत्युपकार घेणं हें त्या वेळच्या आमच्या बादशाही भूमिकेला अगदींच न शोभण्यासारखं कृत्य झालं असतं. तिच्या घरच्या कम्पाउन्डपाशीं तिला गाडींतून उतरून

दिली. जातां जातां तिनं माझं नांव विचारलं, मीं तें बगदादचा सुल्तान असं सांगितलें; तेव्हां ती मजकडे पाहून हंसली व मोठ्या नखऱ्यानं मला नाटकी थाट्याचा मुजरा करून "खुदावंत, मेहेरबान, खलीपसाहेब, गरीबपर निगा रखिये," असं ह्मणून हंसत–हंसतच घरांत निघून गेली!

रामराव:—तुमची स्वारी मग परत आली, होयना?

अण्णा:—होय, पण एक गोष्ट विसरलों. गाडींत बसल्यावर तिला थंडी वाजूं लागली, असं पाहून मी आपली शाल पांघरण्याकरतां तिला दिली, ती मागून घेण्याचं मात्र त्यावेळीं चुकलं. तिच्याचजवळ ती राहिली हें कांहीं बरं झालं नाहीं.

रामराव:—कां बरं? तुझी ओळख काढण्यासारखी एखादी खूण तिच्यावर आहे कीं काय?

अण्णा:—नुसती खूण नव्हे, तर माझं नांव आणि घराचा पत्ता सुद्धां आहे.

रामराव:—ठीक; आतां हें प्रकरण तुझ्या घरात कळलं नाहीं ह्मणजे बरं. सध्यां बायको इथें नाहींच ना?

अण्णा:—पण आज ही आतांच येण्याची वाट आहे. सासूबाईनीं तर मघां त्या शालीबद्दल चौकशी करून ठेविलीसुद्धां. हा सर्व प्रकार इतकाच आतां राहो ह्मणजे देव पावला.

रामराव:—ह्या स्वतंत्र पोरी ह्मणजे मोठ्या भयंकर मोहक असतात. यांच्याशीं सभ्य मनुष्याचा केव्हांही संबंध येऊं नये. थोड्याशाहि सलगीनं त्या एकदम गळ्यांत पडतात, अन् त्यांची मिठी सोडवणं मग फार कठीण होतं! मी सांपडत होतों कीं एकदां असाच चुकून एकीच्या मोहजालांत. पण ती लौकरच एका नाटकांत निघून गेली, आणि मी सुदैवानं अचानक सुटलों. (भोंडिबा येतो.)

धोंडिबा—अन्नासाब, ह्यो योक कागुद आज मोठ्या सकालच्याच कोनसं घेऊन ग्येलाया !

अण्णा:—दे कुठं आहे तो. (पत्र घेऊन) जा तूं.

(धोंडिबा कागद देऊन जातो.)

रामराव:—कायहो गृहस्थ, पाकिटावरील अक्षर पुरुषाचं दिसत नाहीं!

अण्णा:—(पत्र वाचीत) म्हणून तर गड्याच्या देखत पाकीट फोडलं नाहीं. हें पाहिलंस लचांड आतां कसं गळ्यांत पडायला आलं तें. (पत्र त्याला देतो.)

रामराव:—(पत्र मोठ्यानं वाचीत) "वडिलांचे सेवेशीं—काल रात्रीं आपल्याबरोबर फिरण्यांत मला मौज वाटली. त्यावेळीं आपण मायाळूपणानं दिलेली आपली शाल तशीच राहिली आहे. ती आभारपूर्वक परत करण्यासाठीं मी उदईक सकाळीं आपल्या भेटीला येईन. आपली प्रियकर कन्या-गुलाब."

(काकूबाई येतात.)

अण्णा:—(चपापून) अरे, आमच्या सासूबाई आल्या ! (रामराव पत्र घाईनं खिशांत घालतात.)

काकू:—अण्णासाहेब, धोंडिबाला बंदरावर जायला सांगलें. म्हंजे तो कमळेला घेऊन येईल.

अण्णा:—हो हो, सांगाच लौकर. बोट येईपर्यंत तिथंच बैस म्हणावं.

रामराव:—मीहि जरा वेळ बाहेर जाऊन येतों. आज आमचा मुकाम आपलेकडेच होणार आहे.

अण्णा:—अलबत, हे का सांगायला पाहिजे. घर तुमचंच आहे.

काकू:—अण्णासाहेब, ही 'गुलाब' हो कोण ! (रामराव जातात.)

अण्णा:—काय म्हटलंत ? गुलाब ? कोण गुलाब बुवा !

काकू:—'बुवा' नव्हे बाई आहे. आपले ते चैनी स्नेही आत्तां एक पत्र वाचीत होते त्यांत शेवटीं नाहीं का त्यांनीं तें नांव वाचलं ?

अण्णा:—तुम्हीं ऐकलं वाटतं सारं तें ?

काकू:—सारं नाहीं ऐकलं; पण शेवटीं "आपली प्रियकर कन्या गुलाब" असं कायससं त्यांनीं वाचलेलं ऐकलं.

अण्णा:—मग स्पष्टच आहे तें. 'आपली' म्हणजे त्यांची ती 'प्रियकर कन्या' गुलाब.

काकू—त्यांची कन्या ? त्यांनीं अजून लग्न सुद्धां केलेलं नाहीं, ते भटकभाई सडकसिताराम आहेत, म्हणून तुम्हीच मघां म्हटलंत ? मग त्यानां कन्या कुठून आली ?

अण्णा:—मागें भेटले होते, तोंपर्यंत त्याचं लग्न झालेलं नव्हतं. पण आतां ते चांगले कुटुंबी असून त्यांना पांच चार मुलंहि आहेत !

काकू:—पण आपल्या मुलीचं पत्र तुम्हाला वाचून दाखवायचं त्यांना कारण ?

अण्णा:—अहो ती एक आम्हां सुधारक लोकांची ऐट असते. आपली मुलगी 'रटफ' लिहावाचाला शिकली आहे, याचा डौल ते मुद्दाम चार-चौघांत असा मिरवतात! एका ठिकाणीं शिकायला त्यानीं तिला ठेविली आहे, तिथून तिचं तें त्यांना पत्र आलंय झालं. (उठून जाऊं लागतात)

काकू:—असेल झालं; बरं पण आपण कुठें निघालां हे ?

अण्णा:—हे रात्रीचे कपडे आंगावर आहेत ते जरा बदलतों.

(तो आपल्या खोलींत जातो. काकू घरांत जातात.)

इकडे गुलाब ऐटीनें येते; मागून धोंडिबा येतो.

धोंडिबा:—(एकीकडे) इचीभन कोनर हें ! खुशाल आमंदी घुसकीया. इच्या बाचंच घर जनुं ! (उघड) हूं बसा हत खुर्चीवर.

गुलाब:—छे, मी त्या कोचावर पडणार. खुर्चीवर काय म्हणून !

धोंडिबा:—बसा कोचावर बसा. (एकीकडे) आमच्या डोसकीवर बसूं नका म्हंजी झालं ! (उघड) काय नांव सांगूं यजमानांना ?

गुलाब:—माझ्या नांवाची जरूर नाहीं. तुझ्या धनीसाहेबांना इतकंच सांग कीं, मला बगदादचे सुलतानसाहेब अलमगीर बादशहा यांची मुलाखत घ्यावयाची आहे.

धोंडिबा:—आं ? कसं कसं ? (गुलाबनें आणखी एकदां तेंच नांव सांगितल्यावर) काय ? सुलतानचे बादशहा बगदादसाहेब-अमलगीर ?

गुलाब:—डोंबल तुझं. जा तुझ्या धन्यालाच घेऊन ये इकडे.

धोंडिबा:—अपुन नव्हतंबा हें नांव कंदी ऐकलं. इचीभन किती तरी लांबलचक हें ! काय ह्मण अमलगीरचे बादशहासाहेब सुलतान बगदाद ! आतां कोनच्या बोगद्यांत पहावं त्येंना ! (जातो.)

गुलाब:—व: चांगला श्रीमंत गृहस्थ दिसतो आहे हा. ठीक ओळख झाली ह्यांची ही ! ही बाजाची पेटी दिसते. श्रीमंत असून हौशीहि आहे. (पेटी उघडते; अण्णासाहेब येतात.) आइए, गरिबनवाज खुदावंत मेहेरबान खलीपसाहेब ! बंदगी ! बंदगी !

अण्णा:—कोण पाहिजे आहेत आपल्याला ?

गुलाब:—मला अलमगीर सुलतानसाहेबांची गांठ घ्यावयाची आहे.

अण्णा:—तसले कुणी गृहस्थ इथं नाहींत. मला वाटतं आपण पत्ता चुकलां असाल.

गुलाब:—मुळींच नाहीं; याच ठिकाणीं ते राहतात.

अण्णासा:—आपण नीट पोष्ट ह्पिसांत चौकशी करा. या रस्त्यानं उजवे हाताला गेलं कीं, तिथंच पोष्ट ह्पिस आहे. दाखवूं कां?

गुलाब:—इतकी तसदी नको आहे; कदाचित्. 'अण्णासाहेब इनामदार' हें त्यांचं दुसरं नांव असेल.

अण्णा:—[आपल्याशीं] वस्ताद दिसते आहे!

गुलाब:—कां, माहित आहेत कां अण्णासाहेब इनामदार आपल्याला?

अण्णा:—हें नांव माझ्या परिचयांतलं दिसतं.

गुलाब:—असलंच पाहिजे. नीट आठवण करा पाहूं?

अण्णा:—हां हां, समजलों! पूर्वी या घरांत ते राहत असत खरं; पण ते आतां दुसरीकडे राहायला गेले आहेत. काय बरं त्यांचा पत्ता? हो आठवलं. आपण उजव्या हाताच्या रस्त्यानं जाऊन डावीकडच्या पहिल्या गल्लींत वळा; मग मोठ्या रस्त्यानं नीट पुढें जाऊन तिथं बाजार-चौकांत शोध करा. वाईट वाटतं, आपल्याला इकडे उगीच हेलपांडा पडला हा! बरं आहे, या आतां.

गुलाब:—माफ करा. हें पहा मी आतां फार दमल्यें आहे. कांहीं वेळ इथंच बसून विश्रांती घेऊं द्या मला. [कोचावर जाऊन बसते.]

अण्णा:—[त्रासानें स्वगत] कोण ब्याद आली बोवा ही!

गुलाब:—कां हो, पण आपण मला ओळखत नाहीं वाटतं?

अण्णा:—नाहीं बोवा मुळींच नाहीं. आपल्यासारख्यांचा परिचय असण्याइतकं माझं भाग्य कुठलं!

गुलाब:— पण मी आपल्याला पाहतांक्षणींच ओळखलं आहे!

अण्णा:—काय संभव आहे बरं?

गुलाबः—आतां आपण फारच सुंदर दिसतां आहां. आपल्याला दाढी-मिशा लावलेल्या कांहीं बऱ्या दिसत नाहींत. आपला चेहरा त्याच्या-शिवायच जास्त खुलतो.

अण्णाः—दाढीमिशा ?

गुलाबः—होय. काल रात्रीं आपण लावल्या होत्या त्या ?

अण्णाः—(स्वगत) कालचं माझं वेषांतर इच्या पक्कं ध्यानांत आहे.

गुलाबः—कसं काय, कांहीं आठवतं आहे का ?

अण्णाः—खचित तुम्ही कांहीं तरी चुकतां आहां. मी कधींच दाढीमिशा लावीत नाहीं; माझ्या चेहऱ्याला त्या बसतच नाहींत मुळीं.

गुलाबः—मी तरी तेंच म्हणत्यें. खरं सांगूं, दाढीमिशा कशा लावा-व्यात हें तुमच्यापेक्षां मला चांगलं दाखवतां येईल. कारण आम्हाला त्यांचा नेहमीं नाटकांत उपयोग करावा लागतो. दाखवूं का मी त्या तुम्हाला लावून. (उठून एका कपाटापाशीं जाते) याच कां कपाटांत आहेत त्या ? दाढीमिशा साफ बसायला चेहरा मूळचा असा गुळगुळीत लागतो !

अण्णाः—बाईसाहेब, मला वाटतं आपण एखाद्या हेअरकटिंग सलु-नच्या दुकानदारातर्फे आपला कांहीं माल खपवण्याकरतां भलत्याच घरीं चुकून आला आहांत ह्या. हें दाढीमिशांचं प्रकरण मला तर तशां-पैकींच दिसतं.

गुलाबः—रावसाहेब, आतां पुरे करा हें ! माझ्याशीं कांहीं एक चालायचं नाहीं. मी आपल्याला पुरतं ओळखलं आहे आणि आपणही मला पक्कं ओळखतां आहां.

अण्णाः—छे, बुवा मी शपथ वाहतों पाहिजे तर.

गुलाबः—असं का. तर मग हें पहा (पाकिटांतून शाल काढून) ही आहे का आपल्या ओळखीची.

अण्णाः—चल दे, आण ती इकडे पाहूं. (घेऊं लागतो)

गुलाबः— (पुनः पाकिटांत घालून) आत्तां आपण मला ओळखलीत हायना !

अण्णाः—(गोंधळून) प–प–पण मी विचारतों, कीं तूं इथें कशाला आलीस ही !

गुलाबः—माझं पत्र नाहीं मिळालं तुह्माला !

अण्णा :—हो मिळालं, आणि त्यानंच मला गोंधळांत पाडण्याचा प्रसंग आणला होता.

गुलाबः—मी सहज तें गमतीनं लिहिलं होतं.

अण्णाः—अग पण मी कुटुंबी मनुष्य आहें.—तूं हसूं नकोस;—ही थट्टा नव्हे (चिडून) तुला आपली सारी मौजच वाटते आहे.

गुलाबः—अलबत, वाटलीच पाहिजे. माझा धंदाच नेहमीं मौजेंत दिवस घालवायचा पडला. मी इथं सुद्धां घटकाभर मौज मारण्याकरितांच आल्यें आहें आज ही !

अण्णाः—म्हणजे माझे आई, आपण आतां इथं राहणार कीं काय कांहीं वेळ.

गुलाबः—होच. आणि तेंहि क्षणभर अशा गमतींत. (बाजाची पेटी वाजवूं लागते.)

अण्णा :—बाईसाहेब, माफ करा, अहो थांबा ती.

गुलाबः—एखादं पद तरी ह्मणूं द्या. तुह्माला संगिताची गोडी नाहींशी दिसते. आमचं नाटक पाहिलं आहेत कां कधीं?

अण्णासाः—(स्वगत)–सध्यां माझंच नाटक चालवलं आहेस बाई! (उघड) ह पहा, गप्प बैस. तिकडे काकूना ऐकूं जाईल.

गुलाबः—काकू हो कोण ?

अण्णाः—आहेत आमच्या सासूबाई.

गुलाबः—सासूबाई का ? कुठें आहेत बरं त्या ?

अण्णाः—आहेत तिकडे स्वयंपाकघरांत. तूं जा आतां इथनं कशी, हें पहा मोठी मेहेरबानी होईल.

गुलाबः— इतक्यांत नाहीं जाणार मी. गडे असं हो काय करतां. आणखी थोडा वेळ तरी मला बसूं द्या कीं इथं मजेनं. काल मला बळं आपल्या गाडांत घेऊन फिरायला आपल्याला बरं वाटलं, अन् आज मी होऊन गंमतीनं आल्यें तर आपण माझ्याशीं असं वागतां !

अण्णाः—अग पण काल त्या वेळीं बगदादचा बादशहा होतों मी !

गुला —आन् आज मी पण बादशहाची लेक म्हणूनच इथं आल्यें गा ही ! पत्रात मी तेंच लिहिलं होतं.

, अण्णाः—हें पहा, लक्षांत ठेव, कीं तूं इथं माझ्या परवानगी-वांचून आली आहेस. काकू इकडे आल्या तर एकदम तुला घालवून द्यावं लागेल मला.

गुलाबः—असं कां, तरमग बोलवाच बघूं त्यांना इकडे. मला तरी पाहायच्याच आहेत त्या. 'सासूबाई' ह्मंजे एक कशा प्रकारचा प्राणी असतो तें तरी समजेल मला. ही टेबलावरची घंटा वाजवून बोलावूण करूं का त्यांना? येतील का या खुणेनं ! (घंटा वाजवूं लागते)

अण्णासा०—हां हां, माझे आई कृपा कर.

गुलाबः—[कोचावर आडवी पडून] तरमग मी इथं अशी जरा आडवी होत्यें. आपण कसे काय मला घालवून लावतां तें तरी पाहूं याच!

अण्णासा०—[स्वगत] हें एक मोठं लचांड झालं; फार वस्ताद पोर आहे ही !

गुलाब:—[उठून] या जागेचा मला आतां कंटाळा आला गडे. पलीकडच्या खोलींत पाहूं कां कांहीं करमल तर. [जऊं लागते]

अण्णासा०—[तिचेमागें जाऊन] हां हां, ऐक. तिकडे जाऊं नकोस. ती माझी निजायची खोली आहे [इतक्यांत काकू येतात. त्यांना पाहून अण्णासाहेब खोली बंद करून कुलूप घालतात]

काकू:—कांहो कुलूप कां लावतां त्या खोलीला तें.• थांबा ती झाडून साफ करायची राहिली आहे. पारोसा केर निघाला नाहीं तिथला.

अण्णा०—असूं द्या तो निघेल मग. माझे कामाचे कागदपत्र आंत सगळे अस्ताव्यस्त पडले आहेत.

काकू:—पण इथं आतां तुमच्याशीं बोलत कोण होतं? आणि ही बाजाची पेटी उघडून ती वाजवली कुणी?

अण्णासा०—कुणी नाहीं. मीच जरा साफ करून ठेवीत होतों.

काकू:—पण इतकी सुरेख तुम्हाला ती वाजवतांना मी आजपर्यंत कांहीं कधा ऐकलं नाहीं. (गुलाब खोलीमध्यें 'मी तप्त जरी मदन शरे' हें पद म्हणते) पण आण्णासाहेब, तुमच्या खोलींत गुणगुणतं हां कोण?

अण्णा:—तों धोंडिबा असेल.

काकू:—धोंडिबा कसा असेल. तो तर तुमच्या भाचीला आणायला आतां बंदरावर मी पाठवला आहे. आन् हा आवाज बायकाचा दिसतो?

अण्णा:—मग काशी असेल.

काकू:—अहो पण तुम्ही खोलीला कुलूप लावलं आहेना!

अण्णा०—[गोंधळून] खरंच, पण ती पलीकडच्या खिडकींतून आंत गेली असेल.

काकू:—खिडकींतून गेली? खिडकीला तर तावदान आहे!

अण्णा:—कालच त्याची दोन भिंगं फुटलीं.

काकू:—अहो पण आणखी त्या खिडकीला गज मारलेले नाहींत का?

अण्णा:—हां, ती मग आधींच जाऊन बसली असेल आंत!

काकू:—आधीं जाऊन बसली? आन् मागून आपण मग गज मारलेत वाटतं त्या खिडकीला! बघूं द्या बरं मला. घरांतल्या माणसां-देखत कशी बसलीं गाणी ह्मणतेय ती! आणा किल्ली इकडे.

अण्णा:—असूं द्या. मी करीन त्याचा बंदोबस्त; हे पहा तुमचे चिरंजीव आले कसं काय फक्कड, आपण फिरायला निघालांत किंवा फिरून आलांत हे?

[छाकटा पोषाख केलेला बाजीराव कुतऱ्याशीं खेळत येतो.]

काकू:—फिरूनच आलेला दिसतो आहे. कारे बाजिराव, आज लौकर घरीं आलास तो? बाहेर फिरायचा नाद आतां हळुहळु कमी होईल तो चांगला बरंका. तुझं लग्न करण्याचा विचार केला आहे, ऐकलंस का?

बाजीराव:—(स्वगत) हें काय झालं बरं; तिच्या खोलीला आज कुलूप कसं? आमचं संगीत पाखरूं गेलं कुणिकडे? थेटरात नाहीं, बिन्हाडी नाहीं; हाटेलांत नाहीं. मिळाला कीं, काय कुणी नवा शेट तिला!

काकू:—बाजीराव, काय ह्मणत्येंय मी? बाहेरचा नाद तूं आतां सोडून देणारना? तुझ्यासाठीं उत्तम मुलगी पाहिली आहे. आपल्या अण्णासाहेबांचीच भाची. ही आतांच येणार आहे आज रत्नागिरीहून. बरं झालं, समक्ष तुमची आतां गांठ पडेल, एकत्र हंसाल खेळाल, बोलाल तें कांहीं वाईट नाहीं.

अण्णा:—काकू, स्वारीला लग्नाची विशेष हौस दिसत नाहीं. अशांच्या स्वच्छंदपणाला लग्नाच्या योगानें मोठी अडचणच उत्पन्न होत असते, नाहीं बरं बाजीरावसाहेब?

बाजीराव:—तसंच केवळ नव्हे; कुणी मला घरजांवई करून ठेवीत असेल तर आपण खुषीनं लग्न लावून घ्यायला तयार होऊं.

अण्णा:—(एकीकडे) अगदीं बरोबर. कारण सर्व प्रकारची चैन खुशाल चालवून या राजश्रींना रुप्यांच घरांत फुकट बाळगलं आहे मी. मग तर भाचीसाटीं यांदेखिहि यांची चैन संभाळून ठेवणं भाग पडेल मला !

काकू:—मग अण्णासाहेब, आहेना तुमची भाची याला देण्याचा तुमचा पक्का विचार.

अण्णा:— पाहूं मग. येऊं तर द्या तिला आधीं.

काकू:— तरं बरं. आतां वेळच आहे तिची यायची ही. चल बाजीराव तापर्यंत स्नान करून घे. पाणी काढून देत्यें. मग सगळ्यांची एकच गर्दी नको.

(बाजीराव व काकु जातात.)

अण्णा:—(खोलीचं दार उघडून) चल ये बाहेर आणि मुकाट्यानं आता इथून निघून जा कशी.

गुलाब:—जाऊ ?

अण्णा:—जा, जा. पांचवावयला येऊं का चार पावलं ?

गुलाब:—[हसून] छे ग बाई ! आतां ऊन काण झालं आहे. अशा वेळीं माझ्यान बाहेर पडवेल कसं. बसूं द्या आणखी थोडा वेळ.

अण्णा:—तें पहा तिकडून घरांतनं कोणी आलं तर माझी फजीती होईल.

गुलाब:— येऊं द्या कोण येतं तें. मलाहि तुमच्या घरच्या माणसांना भेटायचंच आहे. पाहू तरी कशा प्रकारची माणसं आहेत तीं.

अण्णा:—[स्वगत] आतां हिच्यापुढें काय आपलं डोकं फोडून घ्यावं ! छे, त्या पहा काकु आल्या पुनः इकडे !

(काकु काशीला घेऊन येतात.)

काकूः—अण्णासाहेब ही पहा काशी. ही नव्हती त्या खोलींत [गुलाबला पाहून] अगबाई पण ही कोण ? कोण ग मुली तूं ! कोणाकडे आली आहेस इथें ही ?

गुलाबः—[हळुच अण्णासाहेबास] काय बरं सांगायचं यानां ?

अण्णाः—[गों धळून] कपाळ सांगायचं ! (पुढें होऊन) ही-ही-अहो हां ती—

काकूः —ही ती कोण ? भाची कां ? अगबाई, रत्नागिरीहून आतां आली वाटतं !

काशीः—कोण कोण आमच्या कमळाताई व्हय, अगबाई !

काकूः—कमळे, बरी बाई सुखरूप आलिस. ये बाइ मला भेट एकदा. (जवळ घेतात)

गुलाबः—(एकीकडे अण्णासाहेबास) कमळा हें का नांव माझं ध्यानांत ठेवायचं ?

अण्णाः—(हळूंच तिला) होय होय, हेंच ध्यानांत ठेव आतां. आणि जरा घरगती बायकाप्रमाणें सभ्यपणानं वाग, माझी बया !

काकूः—चल कमळाबाई, हात पाय धुवून थोडं खा. जा काशी. माडीवर जा, आन् फडताळांतून ती मोरावळ्याची बरणी आण बरं काढून अगादर.

(काशी जाते.)

गुलाबः—काकू खाण्या ऐवजीं मला कांहीं प्यायला दिलंत तर फार चांगलं; एकच ग्लास घेतला तरा बरं वाटेल.

काकू—काय म्हणते ही अण्णासाहेब. ग्लास घेतला तर— म्हंजे ?

अण्णासाः—ती नुकतीच बोर्डिंगांतनं आली आहे. तिथं चहा पिण्याला कप् एवजा कदाचित् ग्लासच देत असतील यांना ! बोर्डिंगांतली व्यवस्था ती !

काकूः—बरं कमळे; बैस आधीं. कसं काय शिकणं चाललं आहे तिथं तुझं ?

गुलाबः—शिकणं होय ? इतके दिवस नाचकाम शिकत होतें. पण आतां नाटकांत संगीत काम ही करूं लागल्यें आहे मी !

काकूः—काय ह्मटलंस ? नाटकांत नाचायचं काम ?

गुलाबः—होय असं नाचायचं काम. एकदोन पोजिशिनी दाखवूं कां तुम्हांला !

काकूः—पोजिश्नी नवलच बाई ! अण्णासाहेब ?

अण्णासाः—अहो काकू, तुह्माला समजत नाहीं अलीकडे आमच्या या शाळांतून सुटीच्या वेळीं विद्यार्थी नाटकें करीत असतात. तोच परिपाठ या मुलींच्याहि बोर्डिंगांत असेल. परीक्षा झाल्यावर सुटी होण्यापूर्वी नुकता असा एखादा प्रयोग झाला असेल त्याच्यासंबंधानें कांहीं तरी सांगते आहे, झालं. मुलांना काय आणि मुलींना काय, नाटकाची गाडी आपलं सहज अधिक असायचीच !

काकूः—बरं कितीजणी तुह्मी तिथं शिकायला असतां ? सोबतीला चांगल्या मुली आहेत ना ?

गुलाबः—मुली अशा आह्मी चारपांचच आहोंत. बाकी पुरुष पार्टी पुष्कळ आहेत.

काकूः—अण्णासाहेब, ही 'पार्टी' काय ह्मणते ?

अण्णाः—"पार्टी" ह्मणजे विद्यार्थी. तिकडे तेंच नांव विद्यार्थ्यांना लावण्याचा परिपाठ दिसतो.

काकूः—मला वाटतं कमळे तूं आतां परत जाऊंच नकोस तिकडे. इथं राहून ही तुमची शाळेंतल्या राहणीची भलभलती संवय मोडून टाक. एकाद्यानं पाहिलं तर ही चाल रीत अगदीं छिचोरपणाची दिसेल. कसलं

मेलं शिक्षण या शाळामधनं आपल्या डोंबलाचं देतात कोण जाणं-अग पण आतां तूं बोटींतनं आलीस, तुझं सामान बिमान बरोबर कांहीं दिसत नाहीं तें !

अण्णाः—येतंय मागून. बोटीवरचा गोंधळ तो. धोंडिबा गेलाच आहे धक्क्यावर. सोबत पाहून दिला लावून दिली त्यानं, तो सामान घेऊन येईल आतां.

काकूः—तर मग मला खोलींत तें नीट व्यवस्थेनं लावून ठेवण्याची तयारी केली पाहिजे. सगळींच पाव्हणीं एकदम यायचीं, पसारा पडेल.

(जाऊं लागतात)

अण्णाः—(एकीकडे) येणारीं माणसं म्हणजे आमचं कुटुंब आणि भाचा हीं झालीं पाव्हणीं, आणि या बयांचा मुलगा व ह्या हीं मात्र इथले मालक !


गलाबः—चला काकू, मीहि येत्यें. मला एकादी अगदीं वेगळी स्वतंत्र खोली द्या बरं कां, म्हंजे मी आपली पथारी तिथें लावीन !

(दोघी जातात)

अण्णाः—आतां पंचाईत आली. या एका चवचाल पोरीला बेलाशक भाची बनवून तूर्त घरांत घेऊन टाकली. आता धोंडिबा गेला आहे बंदरावर, तो आमच्या खऱ्या भाचीला घेऊन आला म्हणजे कसं होणार ? छे. आतां तूर्त तर ती या घरांत येतांच कामा नये. पलीकडचा वाडा रिकामा आहे. आपल्याचकडे त्याची देखरेख आहे. तेव्हां सध्यां परभारें तिला द्यावी त्यांत ठेवून. मग पुढें जमेल तसं पाहतां येईल. छे बुवा, या लटपटीचा शेवट तरी काय होणार ? कोणीकडून तें 'अरेबियन् नाइट' पुस्तक वाचण्याची बुद्धि मला झाली आणि विनाकारण या घोटाळ्यांत येऊन पडलों. चांगलं म्हणतात तें पुस्तक, पण मला त्यानं कसं गोत्यांत आणलं आहे पहा. (धोंडिबा कमळेला घेऊन येतो.)

अण्णासाहेबांची धांदल !

(अंक पहिला).



—पृष्ठ २२.—

काकू—अगबाई, पण ही कोण ?

गुलाब—काय बरं सांगायचं यांना ?

अण्णा०—कपाळ सांगायचं !

घोंडिबाः—संभाळा आपल्या या कमळाताई.

कमळाः— मामा, नमस्कार करत्ये.

अण्णाः—आपण आलांत, ठीक आहे!

कमळाः—म्हणजे, याचा अर्थ काय, मामा?

अण्णाः—नाहीं म्हटलं, बरं झालं, सुखरूप आलीस. (घोंडिबास) अरे हें सामान इथं नको ठेवूस? ही किल्ली घे, समोरचा वाडा उघड; कमळेची सोय तिकडे करायची आहे. ती राहील त्या घरात तिकडं.

(घोंडिबा सामान नेतो.)

कमळाः—तिकडे म्हणजे, हें काय! मी एकटी राहूं तिथं!

अण्णाः—होय, तसंच केलं पाहिजे.

कमळाः— बरं मामी कुठें आहे? मी मामीला अजून पाहिलींच नाहीं.

अण्णाः—ती सध्यां गेली आहे पुण्याला, लवकरच येणार आहे. तूर्त घरांत बायको माणूस कोणी नाहीं; तोंपर्यंत तूं समोरच्या वाड्यांत रहा म्हणतों. जनदृष्टीला बरं दिसेल आपलं.

कमळाः—हें रे काय मामा. आज किती वरसानं मी तुझ्या भेटीस आल्यें; चार दिवस आनंदानं राहीन म्हणत्यें तर तूं मला एखाद्या उपरि पाहुण्याप्रमाणं परभारें सोय लावून दूर ठेवणार! मग मी बोर्डिंग सोडून इकडे तरी कशाला आल्यें; तिथंच दुष्टांत राहिल्यें असल्यें.

अण्णाः—हें पहा तूं कांहीं आतां लहान नाहींस. एवढ्या घरांत तूं मी एकटं राहणं चांगलं नव्हे. जनापवादासाठीं तरी असं करणं भाग आहे, कमळे.

कमळाः—वरलारे आला हे जनापवाद; अगदींच चमत्कारिक आहेस तूं.

अण्णाः—हें पहा ती पुण्याला गेल्यामुळें मागं घरांत सारी अव्यवस्था झाली आहे

कमळाः—मग मी करीन सर्व व्यवस्था. शाळेंत आम्हाला घरकाम सुद्धां करायला कसं छान शिकवतात.

अण्णाः—मी सध्यां खाणावळींत जेवतों आहे.

कमळाः—पण आतां मी स्वयंपाक करीन. पहा तर खरं, शाळेंत नानाप्रकारचे पदार्थ उत्तम करायला कशी शिकल्यें आहे मी.

अण्णाः—हें बघ कमळे, खरं सांगूं—

कमळाः—मग आतांपर्यंत सांगतो आहेस हें खरं नाहींच कां ?

अण्णाः—तसं नव्हेग. पण मग करीन मी तुझी चांगली समजूत (घरांतून गडबड ऐकूं येते.) तें पहा मजकडे कोणी येत आहे. जा तूं समोरच्या घरांत; धाडिवा गेला आहे पुढें. मी येतोंच तुझी सर्व सोय नीट लावून द्यायला. जा जा.

कमळाः—[जातां जातां] हें काय मेलं; किती हौसेनं मी मामा-मामीला भेटायला आल्यें. म्हटलं मी शिकलेला एकेक गुण दाखवीन त्यांनां, आन् हें काय परभारें पावणेतेरा ! पुनः मी आपली जशी कांहीं दूर बोर्डिंगांतच ! [रागानं जाते. काकू येतात.]

काकूः—कोण हो गेलं तें अण्णासाहेब ?

अण्णाः—[गोंधळून] माझा स्नेही; मघां आला होता तो.

काकूः—स्नेही ? आन् बांगड्यांचा आवाज ? मला तर पाठमोरी ती बायकोप्रमाणं दिसलं !

अण्णाः—होय. त्याची बायको होती आतां बरोबर.

काकूः—मग तिला घरांतूनं कुंकू लावून जा म्हणून तरी सांगितलं असतं. बाळाबाई या तिला आंत काय बरं म्हणेल मला !

अण्णाः कांहीं नाहीं म्हणत येईल ती पुन्हा इकडे. त्यांना समोरच्या वाड्यातच उतरायला जागा दिली आहे मी. तुम्ही जा आपल्या कामाला.

काकूः—तुमचा मोठा चमत्कार वाटतो मला. अहो, पण इथं पाकीट कुणाचं आहे हें ? घरांतलं कांहीं हें दिसत नाहीं.

अण्णाः—आपल्या चिरंजीवांनीं एखाद्या दोस्ताचं हें आणलं असेल मघां बरोबर. [बाजीराव केस साफ करीत येतो.]

काकूः—होय रे, बाजीराव, तूं आणलंस हें ?–अगबाई ही पहा यांत तुमची ती शाल !

बाजीरावः—हें पाकीट तर आमच्या त्या संगीत पाखराचं ! [पाकिटा-वरील नांव वाचतो] मिस्स मेरी गुलाब, स्टार थिएटर !

काकूः—गुलाब ! तरमग तीच घरं ही; तिच्याच घरीं अण्णासाहेब कालरात्रीं शाल विसरून आले; तीच मघां त्यांच्या खोलींत होती; आन् आतां तरी इथनं गेली ती तीच ! अण्णासाहेब,–पण मी कशाला बोलूं रमा येतेच आहे तो आपली पाहून घेईल. (रागानें निघून जातात. अण्णासाहेब ओशाळगत होऊन वेड्यासारखे उभे राहतात; बाजीराव त्यांच्याकडे गमतीनें पाहून हंसत सुटतो.)

बाजीरावः—बः अण्णासाहेब, ज्या ढंगाबद्दल आम्हाला खंडीभर नांवं ठेवतां त आमचे ढंग आपणहि उचलून आमच्याच पांखरावर झडप आपली ही !–खाशी !–चला, तिलाच आतां थेटरांत गांठून विचारतों. (रागानें जातों.)

(एकदम पडदा पडतो.)

अंक दुसरा.

(स्थळ तेंच---वेळ तीच पुढें.)

काशीः—धोंडिबा, समुरचा वाडारे कुणी उगाडला ? आन् तिथं कुनासंग बोलत व्होतासरे तूं ?

धोंडिबाः—कुनासंग हंजी; आलेल्या पावणी संग !

काशीः—कमळाताई संग? हां, मी फसायची नव्ह बघ. त्या तर इक-डच्या घरामंदी हैता. त्या वाड्यांत एकल्या कशानाईर जात्याल. बोल, सांपडलास कीं नाहीं; कुनासंग बोलत व्हत स तिथं ?

धोंडिबा—अग तुज्या गळ्याच्यान् सांगतों, कमळाताई तकडच हाएती. मी त्यासनी जवा बंदरावरनं घेऊन आलों, तव्हां अनासाव झालं, समुरला वाडा उघड अन् त्याना तकडच ठेव. असं कां तें नकळ बा. मला काय, मी तकड त्याचो सोय लावून दिली.

काशीः—तर तर, कितीरे लबाड बोलशील. चल घरांत मी दावत्ये कमळाताई तुला हकड. तकड तूंच कुनाला आणून बसला असशील तिच्या संग गोष्टी करीत नि काय? मला देतो आदेस थाप. पर हें बघ, अशानं मी काहीं तुझ्याशीं म्हातुर लावाया कबूल व्हायचो नाहीं, सांगलें.

धोंडिबाः—आतां काय करावं इच्या म्होर ! अग आत्तांच बंदरावर जाऊन कमळाताईला घेऊन न्हाईका आलों ? आन् समुरला वाडा उघडून तथं समदं सामान लावून दिलं, आन् आपुन म्हणे कमळाताई हकड या घरामंदी हाएती; असत्याल, आल्या असत्याल काकूंना भेटाया. आन् काय दुसरं ?

काशी:—काकू धनीसायबावर रागावून जाऊन बसल्या हैती टेशनावर. कमळाताईची आन् त्यांची भेट मधांच झाली.

धोंडिबा:—पर तसं कशापाई, चल. त्या वाड्यांत, आन् घे आपली खातरी करून. ये, मी हा तकडच चाललों या. चल कमळाताई दावतों तुला.

काशी:—मी अशी नाहीं येत जा. काकू येयाल तोपोत मला हकड सांगितलेलं काम करून ठेवायचं आहे. तूं जा. तुला आन् ती कोण तकड आणली व्हतीस तिला, अशी न कळत येऊन पकडल्यें कीं तूं बी होय म्हणशील. जा आतां; बोलूं नकोस माझ्याशीं. अंहः!

धोंडिबा:—कमाल केलीस बुवा, असं काय बरं माझे—[तो जवळ जातो—तों आण्णासाहेब येतात.] अर, त्यें बघ अन्नासाब! (दोघे दूर होतात.)

अण्णा:—कायग, काकू कुठें आहेत?

काशी:—काकू स्टेशनावर गेल्याती.

अण्णा:—स्टेशनावर गेल्या? कशाला?

काशी:—मनोरमाबाई आताच्या गाडीनं येत्यात असं कल्याणची कुणी एक बाई शेजारीं आलीया तिनं सांगितलं; म्हणून त्यांना घेऊन यायला गेल्या त्या टेशनवर.

अण्णा:—बरं ती मघांची मुलगी कुठं आहे या वेळीं?

काशी:—कमळाताई ना? घरांत आहेत मागील दारच्या बागांमंदी.

धोंडिबा:—न्हाई व अन्नासाब; खोटं बोलतेयं ही. (धोंडिबा काशी एकमेकांवर चरफडतात.) कमळाताई समुरल्या वाड्यामंदी हाईता, आन् तुमी सांगितल्या परमाण तथं त्यांची सारी सोय लावून मी दिलीया.

काशीः—खोटं सांगतो ह्यो. कमळाताई हकड ह्याच घरांत हैती.

अण्णाः—बरं बरं, जा आपापल्या कामाला.

(काशी व धोंडी एकमेकाला टवकारून जातात.)

चला, आतां आपलं बेत ठरवून ठेवूं या. काय केलं आहे बरं मी ! एका नाटकी मुलीला भाची ह्मणून इकडे घरांत बसवली आहे, आणि खऱ्या भाचीला एका परक्या पाव्हण्याप्रमाणें कांहीं तरी बात मारून तूर्त समोरच्या वाड्यांत ठेवली आहे. इतक्यांत पुण्याहून आमचं कुटुंब आतां या ठिकाणीं येऊन दाखल होणार ! त्यांना आणायला काकुबाई पुढें स्टेशनावर गेल्या आहेत. शालीच्या भानगडीवरून त्यांना माझ्या वर्तनाविषयीं आलेला निष्कारण संशय त्या आतां वाटेनं आमच्या कुटुंबाला आधींच सांगून न ठेवोत ह्मंजे झालं. या घोंटाळ्यांतून आतां आपली सुटका करून कशी घ्यावी ! या पोरीला घालवून देईन ह्मटलं तर तीं मोठी वस्ताद आहे; ती माझ्या बारशाला जेवलेली दिसते. बरं आतां खरं सांगून ती कोण आहे हें सर्वांना कळवावं ह्मटलं तर त्यांतहि फजितीच आहे. कारण मी होऊन तिला बळंच आपली भाची ह्मणून घरांत ठेवून चुकलों. आतां या एकवेळच्या लबाडीची पुढें संपादणी व्हायची कशी ! कदाचित् जसजशी मला आतां संवय होत जाईल तसतसा या लबाडीच्या कामांत मीच पटाइत होणारसं दिसतं, आणि मग, एखाद्या सफाइदार लबाडीनंच या घोटाळ्यांतून मला सहज पार पडतां येईल ! काय होईल तें खरं; पण ही पहा, आमची मंडळी आली.

(काकू मनोरमेला घेऊन घाबरलेल्या येतात.)

काकूः—सुटलें बाई एकदांची ! बैस स्वस्थ आतां इथें. कोणग मेला होता तो ! मेल्यानं अगदीं पाठ पुरवली ! चहाटळ मेले ! जराशी सुरेख बायको दिसली कीं कसे निलाजरेपणानं सारखी पाठ पुरवतात. दुसऱ्याच्या

बायकांवर खुशाल वाईट नजर ठेवायला लाज तर असोच मेलो, पण भीती तरी कशी वाटत नाहीं म्हणत्यें मी यानां!

अण्णाः—काकू, काकू. काय झालं काय?

काकूः—व्हायचंय काय? या माझ्या पोरीला भेडावून सोडलं मेल्यानें! ये झणाव आंत साळसुद घरगुती बायका आणि बाजारबसव्या सारख्याच दिसतात मेल्यांना!

अण्णाः—अहो पण तुह्मी संतापलात कोणावर? इथं कोण आहे?

काकूः—तो; तो पहा, त्या कोपऱ्यावर उभा होता. गेला मेला आतां!

अण्णाः—गेलाना? जाऊं द्या तर मग. जरा स्वस्थ व्हा पाहूं. काय झालं काय, नीट सांगा सारं.

काकूः—सांगायाचं काय आहे! पोर अगदीं घाबरून गेली. पुण्याच्या स्टेशनावर गाडींत बसल्यापासून सारखा मेला माग लागला होता ह्मणे. तीन तीनदां गाडीच्या दाराशीं येई. इच्याकडे गिधाडा-सारखी टक लावून पाही. अगदीं नजरेशीं नजर मिळवी!

अण्णाः—(चेष्टेनें) नजरेशीं नजरना? मग अर्थात् त्याच्याकडे नजर ठेवली असल्याशिवाय कांहीं नजरेशीं त्याची नजर मिळायची नाहा.

काकूः—वः बरेच अहांत कीं तुह्मी हें. त्या मेल्याकडे नजर ठेवून पहायला इचा काय खो‌ळंबा पडला होता. तशांतली आहे वाटतं ही!

अण्णाः—अहो तसं नाहीं मी ह्मणत. पण तशा मनुष्याकडे तोंड फिरवून दुर्लक्ष केलं असत ह्मणजे झालं होतं. आपणच त्याच्या डोळ्याशीं डोळा नाहीं दिला, मग तो तरी आपल्याकडे पाहील कसा?

मनोरमा (हळूंच):—पुरें आपलं; समजल्यें समजल्यें बरं कां मी!

काकूः—अहो रात्रीची वेळ, एकटी ही, अशी दिला पाहून कुणी मेला जर मागं लागला तर त्याला टाळण्याचा किती प्रयत्न केला तरी

साधावा कसा ? कुणीकडे वळलं तरी मेला समोर आहेच. पहिल्यान्दां पुण्याच्या स्टेशनावर हिच्या दृष्टीस पडला.

अण्णाः—(चेष्टेनें) हिच्या दृष्टीस पडला ! कशाला पहावं बरं त्याचेकड ?

मनोरमा (हळूंच)—कांहीं तरीच आपलं. मी कशाला पाहीन !

काकू —पुरतं काय तें ऐकून तर घ्या. गाडींत बसलीं, तो दाराशीं उभा; खिडकाशीं आली—

अण्णाः—(चेष्टेनें) खिडकीशीं आली ! ह्मणजे त्याच्याकडे डोकावून पाहायला—

काकूः—ऐकून घ्या ह्मणत्यें ना मी !

अण्णाः—तसं नव्हे काकू. मी ह्मणतों ही जर पुन्हां खिडकीशीं आली, तर कुणालाही सहज वाटेल, कीं आपल्याकडे लोकांनीं पहावं अशाच मतलबाचं हिचं वागणं आहे.

मनोरमाः—(हळूंच) पुरे आपलं तर्कट हो हें !

काकूः—तर तर, बायकांनीं ह्मणजे अगदीं डोळे मिटून खालीं मान घालून आंधळ्याप्रमाणें जगांत वागलं पाहिजे, असंचना ? आणि पुरुषांनीं—

अण्णाः—तसंच केवळ नव्हे. पण एखादी स्त्री आपल्याकडे टक लावून पाहणाऱ्या पुरुषाला अशा वागण्यानं एक प्रकारें उत्तेजन देईल असं ह्मटलं पाहिजे. बरं पुढें काय झालं. तो हिच्याकडे पाहूं लागला, ही मग खिडकीशीं गेली—

काकूः—अहो पण तो खिडकी लावून घेण्यासाठीं. त्याच्याकडे पाहण्यासाठीं नव्हे बरं का; समजलं ?

अण्णाः—मी समजलों; पण तुमचा आमचा हा समज त्या मनुष्यानं काय म्हणून लक्षांत घ्यावा. मी तरी तसं समजलों नसतों. समजा, मी एका बाईच्या मागं लागलों—

मनोरमाः—(हळूंच) आहे वाटतं आतांशा अभ्यास हा ! तरीच बरं आई त्या शालीबद्दल कायसंसं सांगत होती वाटेनं !

अण्णाः—(हळंच) आपल्या कानापर्यंत आलं का तें ! (उघड) ऐकलंत का काकू.

काकूः—हो ऐकतेय. आन् रमा पण ऐकतेय ! आपण एका बाईच्या मागं लागलां, पुढें ?

अण्णाः—अहो, मी एक कल्पना सांगत होतों तुह्माला ती. बरं राहूं द्या आमचं. तुमचीच हकीगत सांगा. तो पुण्याच्या स्टेशनावर दृष्टीस पडला.पुढें ?

काकूः—पुण्याच्या स्टेशनावर हिनं खिडकी लावून घेतली आणि आंत बसली. तरी पण वाटेनं कल्याणपर्यंत त्यानं एक दोन स्टेशनांवर डब्याच्या आंत डोकावून हिच्याकडे पाहण्याचा प्रयत्न केलाच. शेवटीं त्याच्या त्रासानं ही मधेंच कल्याणच्या स्टेशनावर उतरली आणि मागून एका लोकल गाडीनें ही आत्तां आली. काय करावं, मी त्या वेळीं रमाबरोबर पाहिजे होतें, ह्मणजे मेल्याची चार चौघां समक्ष चांगलीच खरड काढली असती !

अण्णाः—पण त्यांत आपलीहि मौज लोकांना दाखवावी लागली असती, नव्हे का ?

काकूः—कांहीं हरकत नव्हती. त्या मेल्याची तर चांगली शोभा झाली असती कीं नाहीं.

अण्णाः—मला वाटतं असे प्रसंग केवळ दुर्लक्ष करूनच टाळावेत हा सभ्य मार्ग होय.

काकू:—रमानं तरी माझ्या तसंच केलं. (रमास) बरं, चल बाई घरांत. हातपाय धू, वाटेचं हें लुगडं सोडून दुसरं नेस–हो गडे विसरलेंच मी सांगायला;–अग तुझी भाची आली आहे रत्नागिरीहून, भेट तिला. चल.

(रमा व काकू जातात.)

अण्णा:—(आपल्याशीं) आतां ही मामीभाचीची भेट कशी काय होणार पहावं ! काकूप्रमाणेंच हिच्याशीं बोलतांना तिनं आपले गुण पाघळूं नयेत म्हणजे झालं. पण हें होणार कसं ! अगदीं नखशिखान्त नाटकी ढंगानं चवचाल बनलेली ही पोर, क्षणभर उसना तरी घरगुती बायकांचा सभ्य डौल आपल्या अंगांत दाखवणार कशी ! म्हटलं असतां असंहि वागणं तिला साधूं नये असं नाहीं. नाटकी विद्येच्या अभ्यासानं वाटेल तो भाव तिला दाखवतां आला पाहिजे, पण तसं शिक्षण यांना नाटकांतून मिळतंय कुठें ! सरसकट सारा छिचोरपणा ! घटकाभर फजिती टाळण्या-साठीं मी तिला कमळेची भूमिका दिली खरी, पण हाडींमाशीं खेळलेल्या छिचोरपणानं ती मला आधिक गोंधळांत टाकणार असं दिसतं ! [मनोरमा पुनः येते] या तुम्ही, भाचीची गांठ पडली कां ?

मनोरमा:—नाहीं. तेंच मी विचारायला आल्यें. कुठं आहे ती ?

अण्णा:—असेल मागील दारींच. पण सांगून ठेवतों, तिचा स्वभाव आपला चमत्कारिक आहे हो.

मनोरमा:—असेलच. आम्ही सारीं नवखीं माणसं आहोंत तिला. जरा दूरदूर बुजरेपणानंच वागेल.

अण्णा:—छे, नांव नको. फाजील सलगीनं वागेल ! बोर्डिंगांतलं स्वच्छंद वळण आहे तिला.

मनोरमा:—मग कशाला ठेवली आहे तिला तसल्या त्या शाळेंत बरं ! इथंच ठेवून घ्यायची होती आतां.

अण्णाः—तिचं वर्तन आणि तिचा स्वभाव हीं पाहिलीं असतां यापुढें आपल्या घरांत जमणार नाहीं तिचं.

मनोरमाः—बोर्डिंगांत शिकायला ठेवलेल्या मुली पुनः कुटुंबांत वागायला अशा का निरुपयोगी होत असतात पुढें?

अण्णाः—(एकीकडे) हिच्यावरूनच कल्पना केली तर मात्र असं म्हणावं लागेल.

मनोरमाः—आईला दिखील तिची वागणूक जरा तऱ्हेवाईकच वाटलेली दिसते. तरी पण आपल्या इतका कांहीं तिच्याविषयीं तिला तिटकारा नाहीं. ती तर बाजीरावाबरोबर तिचं लग्नहि लावून घ्यायला तयार झाली आहे.–बरं असो; म्हटलं ह्या आंब्याच्या वड्या घ्यायच्या होत्या. आईनं सांगितलं कीं, अझून कांहीं आपण चहासुद्धां घेतला नाहीं. निजूनच उठायला आज उशीर झाला. रात्रीं बाहेर जाणं झालं होतं वाटतं. बरोबरच आहे. इथं मी नव्हत्यें, मग काय!

अण्णाः—काय भलताच आळ बरं हा! तूं नसल्यामुळं मला मागं इथं करमत नवतं हें बरीक खरं; पण ती करमणूक मी भलत्याच रीतीनं करून घेईन अशी तुला शंका तरी आली कशी? तुझ्याशीं माझं वर्तन असं का आहे? तूं जशी माझ्याशीं तसंच मलाहि तुझ्याशीं एकनिष्ठच असलं पाहिजे; नव्हे का?

मनोरमाः—मग काल रात्रीं आपण उशीरां घरीं आला होतां, हें तर खरं ना? आई आपली कुरकुरत होती.

अण्णाः—हें बघ, रात्रीं सहज फिरायाला बाहेर गेलों होतों, झाला थोडा उशीर. घरीं तरी एकटंच पडायंच ना!

मनोरमाः—आणायचं होतं झुकटं कोणाला! मी म्हणत्यें, दिवसां–सकाळीं–आणण्यापेक्षां रात्रीं आणणं आपलं त्याहून बरं, होय ना!

अण्णाः—काय म्हणतेस, दिवसां–सकाळीं? सकाळीं कुणाला आणलं मी? आणि कधीं तें?

मनोरमाः—-कधीं कशाला? नुकती एक घटकासुद्धां झाली नसेल. आत्तां मी येण्यापूर्वी. त्याच तर रागानं आई मला आणायला स्टेशनावर निघून आली होती.

अण्णाः—(आपल्याशीं) खाशी सोय!

मनोरमाः—कां, गोंधळलांत असे?

अण्णाः—गोंधळ कशाचा?

मनोरमाः—मग कोण आली होती बरं सकाळीं ती?

अण्णा०—अग कोणी नाहीं.

मनोरमा०—कोणी नाहीं कशी? सांगायचं होतं, कोण आली होती?

अण्णाः—(गोष्ट उडवून देण्याच्या मिषानें) त्या पहा काकू तुला हाक मारताहेत तिकडे; जाऊन आधीं आपल्या भाचीला भेटून ये पाहूं. मग सांगेन तुला मी तें सर्व.

मनोरमाः—मग कां? तोंपर्यंत कांहीं थाप योजून ठेवायची आहे वाटतं. (जातां जातां) पण मी फसायची नाहीं बरं का. खरं तेंच मला कळलं पाहिजे. साफ सांगून ठेवलें अगदीं. खोटं ऐकायची नाहीं! (जाते.)

अण्णाः—(आपल्याशीं) खरं आणि खोटं! इथून तिथून मला आतां एकसारखं खोटंच बोलत गेलं पाहिजे. जें खोटं तें माझं खरं, आणि अशा या खोडसाळ खरेपणानंच मी आपण होऊन आपल्यावर ओढून घेतलेल्या या गोंधळांतून मला आतां धडपणीं बाहेर पडायचं आहे. खरोखर या जगांत वागतांना मनुष्यानं एक खरेपणानं तरी वागावं, नाहीं तर नेहमीं खोटंच बोलत जावं. कांहीं खरं कांहीं खोटं झालं कीं त्याचा गोंधळ उडालाच! खऱ्याच्या जोडीला खोटं चालायचं नाहींच,

पण खोट्याचीही संपादणी खऱ्यानं होण्याची मग पंचाईतच पडते. चला, खोलींत जाऊन थोडी विश्रांति घ्यावी. कारण जसं खरं बोलायला तसंच वारंवार खोटं बोलायला सुद्धां डोकं हें ठिकाणावर असलंच पाहिजे. गोंधळून जातां उपयोगी नाहीं. (निजावयाच्या खोलींत जाऊन दार लावूनं घेतो.)

(कमळा व तिच्या मागोमाग रामराव अशीं येतात.)

रामराव:—आं, कोणीकडे हें !

कमळा:—आपणहि म्हटलं ?

रामराव:—माझ्या मित्राकडे आलों मी.

कमळा: —मी आल्यें आहे माझ्या मामाकडे.

रामराव:—मामा कोण ! आण्णासाहेब वाटतं ?

कमळा:—आन् आपले मित्रहि पण तेच ? होय ना ?

रामराव:—वः हें फारच चांगलं झालं म्हणायचं ! एक कामगिरी फसली तर त्याहून गोड अशी ही दुसरी साधली.

कमळा:—कामगिरी, ती काय बरें ?

रामराव:—रत्नागिरीस भेटलों होतों त्यानंतर मला एका शहाजादीची तसबीर काढण्याचं काम मिळालं. कामाची आंखणी करीत असतां शहाजादीच्या चेहऱ्याला एक प्रकारचा मोहकपणा आणण्यासाठीं तशा तोंडवळ्याची एखादी स्त्री दृष्टीस पडेल ह्मणून थोडा प्रवासास निघालों. फिरतां फिरतां काल रात्रीं पुण्याच्या स्टेशनावर गाडीमध्यें तशा चेहेऱ्याची एक स्त्री आढळली. तेव्हां तिचा चेहरा नीट रेखाटून घेतां यावा ह्मणून त्याच गाडीनं इकडे येण्यास निघालों.

कमळा:—वः ! चांगला ह्मणायचा धंदा हा ! प्रतिष्ठितपणाला आपली रजाच दिली पाहिजे यांत !

रामरावः—तसंच कांहीं नव्हे; पण कालचं मात्र माझं वर्तन जरा अधिक झालं खरं आणि त्याबद्दल मला फार वाईट वाटतं आहे.

कमळाः—म्हणजे? त्या स्त्रीची कांहीं अमर्यादा झाली कीं काय?

रामरावः—निदानं तिला तरी तसं वाटण्याचा संभव होता खरा. माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मी त्या स्त्रीच्या नकळतच तिच्या चेहऱ्याची मोहक ठेवण उतरून घेण्याचा प्रयत्न केला, पण एकाएकीं तिच्या तो नजरेस येऊन ती सहजच मला अतिशय टाळण्याचा प्रयत्न करूं लागली, आणि इकडे मी करून घेतलेली आंखणी थोड्यासाठीं अपुरी सोडायला माझं मन घेईना!

कमळाः—आणि मग?

रामरावः—मग मी त्याच गाडींत बसून तिच्याबरोबर इकडे आलों; पण शेवटीं कल्याणच्या स्टेशनापासून आमची चुकामुक झाली, तेव्हां तसाच हा इकडे आलों.

कमळाः—तर मग शहाजादीची तसबीर अपुरीच राहिली म्हणायची! इतकं लांब येऊन उपयोग कांहींच नाहीं.

रामरावः—कांहींच नाहीं असं आतां तरी म्हणायाला नको. ती अपुरी राहिली तर तिच्याऐवजीं दुसरी एक आतां पुरी करून ठेवायला सांपडेल.

कमळाः—ही दुसरी कोणाची? आणि कोणाकरितां चालली आहे ती?

रामरावः—दुसऱ्या कोणाकरितां नाहीं; माझ्या स्वतःकरितांच आहे ती? आणि कोणाची तसबीर तें सांगूं का?

कमळाः—कुणाची?

रामरावः—आणखी कोणाची बरं? रत्नागिरी इथं बोर्डिंगांत असतां जिनं थोड्याच वेळांत आपल्या सद्गुणानं, सौजन्यानं, आणि सौंदर्यानं माझं मन आपल्याकडे पूर्ण आकर्षून घेतलं, तिची! आली का लक्षांत आतां कुणाची ती?

कमळाः—(लाजून) मला नाहीं माहीत. (जाऊं लागते.)

रामरावः—मग ही तरी माझी तसबीर इथं पूर्ण होईल का ?

कमळाः—याचं उत्तर मामाकडून मिळविलं पाहिजे, हें मागंच मीं सांगितलं आहे.

रामरावः—आतां अण्णासाहेबांकडून मला अनुकूलच रुकार मिळेल; त्याची शंका नाहीं ! फक्त—

कमळाः—पण मग मला तरी मामाच्या विरुद्ध असावयाचं कारण काय आहे ?

रामराव—अहाहा ! झालं माझं काम. इतक्या दगदगीचं अगदीं आवडतं बक्षीस मिळालं हें मला ! चला तर अण्णासाहेबांचा समक्षच रुकार मिळवूं या.

कमळा—मला मामाचीच गांठ घ्यायची होती. पण—अंहः—अतां मात्र मी नाहीं येणार आंत. समोरच्या वाड्यांत त्यानं मला उतरविली आहे ! (कमळा जाते व अण्णासाहेब खोलींतून बाहेर येतात.)

अण्णा:—अरे, कुठें चक्कर मारून आलास इतक्यांत !

रामराव—सहज स्टेशनपर्यंत जाऊन आलों. बरं रत्नागिरीहून तुझी भाची आतांच आली आहे, होय ना ?

अण्णा—भाची ? कोणती भाची; आन् तुला काय माहिती तिची ?

रामराव—तुझी भाची ह मला आतांच समजलं ! पण रत्नागिरीच्या फीमेल बोर्डिंग स्कुलांतील विद्यार्थिनींना ड्रॉइंग शिकवतांना तिथं मीं तिला पाहिली आहे.

अण्णा—हां हां. म्हणजे रत्नागिरीहून आलेली माझी खरी भाची तूं म्हणतोस होय ?

रामराव—खरी भाची म्हणजे ?

अण्णा—हें बघ, आतां दोन भाच्या एकदम घरांत आणल्या आहेत मी. एक खरी आणि एक खोटी.

रामराव—खोटी ?

अण्णा—होय, अगदीं बनावट ! अस्सल नाटकी ?

रामराव--काय म्हणतोस तरी काय हें ? तुझं डोकं ठिकाणावर नाहींसं दिसतंय. मग तूं मला काय नीट उत्तर देणार ?

अण्णा--खऱ्या भाचीसंबंधानं असेल तर उत्तराची पंचाईत नाहीं. कारण खऱ्याची वाट सरळ असते. पण खोट्यासाठीं मात्र एकापेक्षां एक अडचणींतून जाण्याचा मानस्वी त्रास करून घ्यावा लागतो. याचा पूर्ण अनुभव आला आहे आतां मला.

रामराव—ही तुझी बडबड मला कांहींच समजत नाहीं. मी आपला सरळ विचारतों. सांग, तुझी भाची मला द्यायला तूं कबूल आहेस कां ? आपण आतां संसारी होणार.

अण्णा--पण तूं संसारी नाहींस कुठें ? तुझं तर मघांच मीं लग्न करून टाकलं, आन् त्यापूर्वीं तुला एक मुलगीहि उत्पन्न केली ! आधीं बनवली तुला मुलगी, आणि नंतर लावलं तुझं लग्न !

रामराव--खचित तुझं डोकं फिरलेलं दिसतंय !

अण्णा—निदान माझ्या गोंधळण्यानं इथली तूर्त परिस्थिति तरी फिरवून टाकल्यासारखी झाली आहे खरी ! चल, खोलींत चल. मी आतां तुझ्याच मदतीनं शुद्धीवर येण्याचा प्रयत्न करून बघतों.

(दोघेहि खोलींत जातात, गुलाब येते.)

गुलाबः—कोण मेली घरांतलीं माणसं आहेत कोण जाणं; सारीं कशीं आंबलेलीं; रंगेल एकहि नाहीं. कंटाळा आला आपल्याला. अण्णा-साहेब तर काय ? अहाहा !—

" बहु शांत दांत विपयविरत तापसी महा ॥
यावरि मन टेविशि हें न्याय काय हा ॥ "

—तर मग मला वाटतं आतां—

" जावें हें उचित दिसे येथुनी घरा. ॥"

(बाजीराव येतो.)

बाजीराव—खाशी, खाशी! वाहवा! वन्समोअर! वन्समोअर!

गुलाब—आं, ही स्वारी इकडे कुणीकडे?

बाजीरावः—ह्या कोण? आमच्या मिस् मेरी गुलाब कीं काय? आन् इथं त्यांचं काम?

गुलाबः—अण्णासाहेबांच्या भाचीचं सोंग करायचं आहे मला.

बाजीरावः—मग तें आपल्याकडे आहे कीं काय?

गुलाबः—होय. त्यांनींच लावलंय तें करायला.

बाजीरावः—पण त्यांच्या भाचीशीं तर माझं लग्न व्हायचं ठरतं आहे.

गुलाबः—हरकत नाहीं. तीहि बतावणी मला मान्य आहे. आण्णासाहेब स्वतः जर हा आपला संबंध जुळवून देत असेल तर उत्तमच होईल. माझ्या स्वभावाला अनुकूल असे या घरांत आपणच कायते मला एकटे दिसलांत?

बाजीरावः—आणि याच घरांत काय पण साऱ्या दुनियेंत मला जर कोणाचा नाद असेल तर तो स्टार थिएटरमधील या एका मिस् मेरी गुलाबचाच होय, हें आपल्यालाहि कधींपासून माहीत आहेच.

गुलाबः—काढा तर कपाटांत कांहीं असेल तर. आपण आपला मेळ अधिकच बसवून टाकूं. सकाळपासून फारच तहान लागली आहे मला.

बाजीरावः—तर मग हें घ्या. कपाटांत कशाला, पाकिटांतच आहे! (खिशांतून बाटली काढतो.) करा ती वाटी इकडे. अरे वः आंब्याच्या वड्याही आहेत. हं घ्या हा ग्लास!

गुलाबः—आन् आपण?

बाजीरावः—आपल्यांतला अर्धा माझा!

(दोघे दारू पितात; वाटींतल्या वड्या खातात.)

गुलाबः—आपण ह्याच घरांत असतां वाटतं.

बाजीरावः—घरांत ह्याच राहतों, पण ह्या घरचा मात्र मी नव्हें.

गुलाबः—तरी पण आपली सत्ता बरीच आहे इथं.

बाजीरावः—आमच्या अण्णासाहेबांचा स्वभाव पडला भीडस्त भारी. त्याचा फायदा मिळतो आहे झालें.

गुलाबः—पण हें नेहमीं चालणार कसं?

बाजीरावः—नेहमींची कोणाला काळजी. तूर्त चैन आहे, झालं. अण्णासाहेबांच्या भाचीशीं माझं लग्न जमवून आणण्याचा आमच्या आईनं चालवलाहे बेत. पण त्या भाचीचं आणि माझं मुळींच जुळणार नाहीं. ती शाळेंत शिकलेली, मी कधींच शाळेंत न गेलेला; तिला कसलं तें एकहि व्यसन नाहीं आणि मला सगळ्याच व्यसनांचा शोक; ती संभावितपणानं वागणार, मला चैनीनं असावंसं वाटणार. मग हा मेळ बसावा कसा? अण्णासाहेबांना माझा स्वभाव माहीत आहे आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या भाचीच्या ठिकाणीं—आमच्या आईच्या समजुतीसाठीं—माझ्या मनायोग्य अशा या रत्नाची योजना केलेली दिसते.

गुलाबः—कांहीं का असेना, तर मग आपण तिचा पुरता फायदा करून घेऊं या; हातीं सांपडेल तें घेऊन इथून आतां 'यःपलाय' करूं म्हणजे झालं. आजच रात्रीं आमची कंपनी इथून दूर हैदराबादेकडे जाणार आहे!

बाजीरावः—हा बेत ठीक दिसतो. मला सुद्धां नेहमीं इथं सासुरवासांत राहण्याचा कंटाळाच आला आहे. चला, मागीलदारीं जरा एकीकडे बसून हें कसं काय करायचं तें नीट ठरवूं या.

गुलाबः—ही मी तयार आहे. चला तर मग गडे मला कडेवर घेऊन.

बाजीरावः—हात्तेच्या. कडेवर काय पण डोकीवर सुद्धां घेईन.—

" स्वमनीं वा नयनिं शिरीं ठेविन मी सुंदरीला ॥ "

—पण इतक्यांत नाहीं. एकदा इथनं निसटून स्वतंत्र झाल्यावर. तूर्त पाहिजे तर अशा थाटानं जाऊं या. (एकमेकांच्या गळ्यांत हात घालून हंसत खिदळत जातात.)

(दुसरीकडून काकू अण्णासाहेबांना घेऊन येतात.)

काकूः—पाहिलंत अण्णासाहेब, त्या दोघांचं कसं एकमत्त आहे हं! इतक्यांतच कशी गमतीनं वागताहेत. आतां काय ह्मणणं आहे तुमचं?

अण्णा०—तुम्हालाच आवडत असल्यास पहा आपलं; मला कांहीं या दोघांचा हा संबंध पसंत नाहीं. त्या मुलीचं वागणं अगदीं बेशिस्त व गैरचाल. कोठून तिला मी भाची ह्मटलंय असं झालंय मला. असली भाची मला नाहीं कबूल.

काकूः—असूं द्या. बाजीरावाच्या स्वच्छंदपणाला बरी ताळ्यावर आणण्यासारखी बायको दिसते आहे. आमच्या रमासारखी अगदीं सालस नि गरीब बायको, नाहीं तरी, त्याला उपयोगाचीच नाहीं. असल्या माणसाकडून तिचे हालच व्हावयाचे! हं पहा तुह्मी आतां कांहीं उगाच आढेवेढे घेऊं नका. ह्या संबंधाला आपला रुकार द्याच कसा. मला आपला हा जोडा पसंत आहे.

अण्णा०—तुह्मीच पसंत केल्यावर मग काय ह्मणायचं आहे! बाकी पुढें मग दोष नको.

काकूः—पण आपल्या पसंत नापसंतीची त्यांनीं वाट पाहिलीच आहे कुठें? आतां आपण होऊन त्यांचं लग्न लावून द्यावं यांत आपला मान आहे. चला, मी रमाला घेऊन येतें. याच घटकेला पक्कं करून टाकूं. (काकू जातात.)

अण्णा:०—–ठीक, एक गोंधळ परस्पर उलगडणार ह्मणायचा. ही चवचाल पोर तिजसारख्याच त्या उटवळाच्या गळ्यांत पडून दोघांच्या त्रासांतून मी एकदम मुक्त होणार असं दिसतंय ! आतां आमच्या खऱ्या भाचीची व्यवस्था राहिली. रामरावानं तिची मागणी केली आहे. मी जो या बाबतींत गोंधळ केला आहे त्यासंबंधानं खरी हकीकत त्याला सांगून तिची समजूत घालण्यासाठीं त्याला तिकडे पाठवून दिला आहे. (समोरच्या वाड्याकडे पाहून) ती पहा, कमळा खिडकींत उभी आहे. मला बोलावते आहे वाटतं तिकडे; पण आपण तिकडे जाण्यापेक्षां तिलाच आतां इकडे बोलावून हा गोंधळ उलगडून टाकावा. खरोखर काळोखांतून प्रकाशांत आल्यावर जसा तो अधिक रमणीय वाटूं लागतो तसंच खोट्यानंतर खऱ्याची गोडी विशेष वाटते. (वाड्याकडे पाहून) पुन: ही खिडकींत आली.

(तिला येण्याविषयीं खुणावतो इतक्यांत मनोरमा येते.)

मनोरमा:—–(खाकरून) कां, कोणाला खुणावणं चाललं आहे तें. मी पाहिलं बरं का !

अण्णा:०—–(चपापून) अरे बापरे ! आली पुन: खोट्याची पाळी ! (उघड) काय पाहिलं आपण ! कोणाला खुणावीत होतों मी !

मनोरमा:—समोर तें खिडकींत कोण होतं त्याला.

अण्णा:—–तो माझा मित्र रामराव; आजच सकाळीं आला.

मनोरमा:—सकाळीं आलेला तोच ना ? काल रात्रीं शाल त्याच्याच घरीं विसरून यायची झालं ? अन् त्यांचं नांव मात्र रामराव पण दिसतो बायकोसारखा ! अथवा बायकोच आहे तो, नाहीं बरं ?

अण्णा:—आतां काय सांगावं––

मनोरमा:—वाटेल तें सांगावं. बायकोला काय, कांहीं सांगितलं तरी चालतं. तिनं तें खरं मानलंच पाहिजे. बाकी प्रत्यक्ष मी हें पहात्यें ह्मणून बरं.

अण्णाः—अग तो--

मनोरमाः—'तो' कशाचा; चांगली 'ती' आहे कुणीतरी. मीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली; त्या खिडकींत उभी होती आणि आपलं तिला खुणावणं चाललं होतं. चांगलं बरंका हें; शोभतंयना आपल्याला. चारच दिवस इथं नवल्यें तों हा प्रकार मागं,–अगर मागं कशाचा, आतां माझ्या समोरच चालायचा हा !

अण्णाः—पण माझं ऐकशी—

मनोरमाः--मी कांहीं ऐकायची नाहीं. प्रत्यक्ष पाहिलं तरी आपली संपादणी चाललीच आहे. आज समोर आणून ठेविली, उद्यां घरांतही येईल. देवा, असा प्रसंग येण्यापूर्वी माझे डोळे मिटतील तर फार बरें ! इकडची मजवर फार प्रीति पाहून मी आपल्याला किती सुखी समजत होत्यें. पण एवढ्या थोड्याशा अवकाशांत अशा थरावर गोष्ट आली– (रडूं लागते.)

अण्णाः--छे बुवा, आज सकाळपासनं जी माझी धांदल उडाली आहे तिचा आतां मात्र कळस झाला ! सत्यदेवते, ये बाई माझ्या आतां साह्याला आणि या गोंधळांतून सोडीव मला.

(कमळा व रामराव येतात,)

मनोरमाः—आपला कशाचा गोंधळ. मीच आपल्या जीवाचं कांहीं बाई करून घेतलं म्हणजे झालं ! (स्फुंदत जाऊं लागतें तों समोर रामरावाला पाहून घाबऱ्यानें) अग बाई तोच ता गृहस्थ ! आला बाई पुनः ! (अण्णासाहेबांना येऊन बिलगते)

रामरावः—(पुढें होऊन) ओहो ! शेवटीं शहाजादी आम्हाला इथेंच सांपडली ही !

अण्णाः—कोण हीच का तुझी शहाजादी ती ! तरी मला तुझी हकीकत ऐकतांना संशय आलाच होता ! वाहवा, तर मग

कालरात्रीं आह्मी बगदादचे सुलतानसाहेब झालों होतों तें योग्यच ह्मणायचं! आह्मीं बादशहा आणि ही शहाजादी! अहो चितारी गृहस्थ, आतां आह्मा दोघांची मिळून एकत्र एकच तसबीर करा. ह्मणजे क्षणभर उडालेल्या या विचित्र गोंधळाचं स्मारक ह्मणून याच दिवाणखान्यांत लावून ठेवूं ती?

कमळा—(पुढें होऊन) मामी तुला मी नमस्कार करत्यें.

रामराव:—मी सुद्धां यांना नमस्कार केला पाहिजे.

अण्णा:—होय. एक सासुबाई ह्मणून आणि दुसरं शहाजादीसाहेबांना आगगाडींत त्रास दिलास ह्मणून!—(मनोरमेस) ऐकलंस आतां, आपली खरी कमळा ती ही. आणि हे माझे बाळपणाचे परम दोस्त रामराव देशपांडे. यांनीं तिची मागणी केली आहे आणि यांना ती देण्याचं मी कबूल केलं आहे.

मनोरमा:—ही का कमळा, मग घरांत आहे ती कोण? समोरच्या वाड्यांत हीच होती! (हळूच) मग मी उगाच आपल्याला दोष दिला याची मला क्षमा करावी गडे.

अण्णा०—माझं असूं दे. पण आधीं आमच्या या चितारी मित्राला तूं क्षमा कर. यानं वाईट बुद्धीनं तुला त्रास दिला नाहीं. त्याला बगदादच्या बादशहाची सुंदर पत्नी जी शहाजादी तिची तसबीर काढायची आहे आणि त्या चेहऱ्याला जी मोहकता पाहिजे ती या ठिकाणीं त्याला उत्तम आढळली!

मनोरमा:—(लाजून) चला, कांहीं तरी हें.

अण्णा०—खोटं नाहीं सांगत मी. आतांपासून खोट्याला अगदीं रजा दिली बघ; पण याची तसबीरच पाहिल्यावर तुझी खात्री होईल.—बरं कमळे, मला तूं क्षमा केली आहेसना! तुला येतांक्षणीं तिकडे कां

ठेविली हें रामरावानं सांगितलं असेलच. आतां तुझ्या नांवानं घरांत घेतलेल्याल्या नाटकी पोरीचा उलगडा राहिला.

मनोरमाः---नाटकी पोर ! म्हणजे नाटकांतली का ती मुलगी आहे? आन् आपण आणली वाटतं तिला घरांत?

अण्णा०---नाहीं; बळं आज सकाळीं ती इथं कांहीं निमित्तानं घुसली. तेव्हां प्रथम गोंधळून मी तिला 'भाची' म्हणालों; पुढें युक्तीनं तिला काढून लावणार तों काकूंनीं आपल्या बाजीरावाशीं तिच्या लग्नाचा आग्रह धरून व त्या दोघांचाही एकमेकाशीं बराच परिचय असल्याचं दिसून येऊन---

(काकू येतात.)

काकूः---मग कसं अण्णासाहेब, त्या दोघांचं अगदीं पक्क ठरलं. आतां तर आहेना तुमचा रुकार?-(रामरावास पाहून) अगबाई, पण हे कोण ?

अण्णा०---मघां आलेले स्नेही, रामराव देशपांडे, ते हे.

काकूः---(कमळेस पाहून)-अन् ही त्यांची बायको वाटतं. अगदीं लक्ष्मी नारायणाप्रमाणंच यांचा जोडा शोभतो आहे हा ! मघां इथनं येऊन गेलीं तीं हींच, होय ना? मी उगाच संशय घेऊन तुमच्यावर रागावल्यें त्या शालीवरनं.

अण्णा०---खरंना; हेंहि तुम्हांला आवडलं, बरं झालं. इथं येण्यापूर्वीच यांचं हें लग्न ठरलं होतं. फक्त माझा रुकार पाहिजे होता यांना-

काकूः---तर मग एवढ्या करतांच कां मघां इथं हीं---

अण्णा०---बाकी काकू, तुमचा शालीबद्दलचा संशय मात्र बरोबर होता.

काकूः---म्हंजे, बाजीराव म्हणाला त्याप्रमाणें ती शाल घेऊन कोणी 'गुलाब' च का आली होती मघां ! ऐकलंस रमे.

मनोरमाः---आई, हा काय गोंभळ आहे तो चल मी तुला नीट सांगत्यें.

अण्णा०—हं आपणच घ्या हें मनावर. कारण माझ्या खरेपणाला सुद्धां अझून दुसऱ्याच्या साक्षीची जरूर आहे. (काकू व रमा जातात.) बाकी खरेपणाची गोष्ट काय सांगावी. आंगावर पडलेलं एखादं जड ओझं हळु हळु खालीं व्हावं असं मला या एकेक उलगडयानं होत आहे.

(धोंडी व काशी भांडत येतात.)

धोंडीबाः—अन्नासाब, तुमीबी आतां हिची खातरी करा कशी. समुरल्या वाड्यांत ह्या कमळाताई नव्हत्या का मंगा?

काशीः—ह्या कमळाताई, मग त्या कोण ? घरांतलं मार फडताळन् फडताळ धुंडीत बसल्याती.

अण्णाः—अरे, ही पोर चांगलाच आह्माला चट्टा लावणार ! धोंडिबा, जा असाच आणि अगोदर तिला परभारें घराच्या बाहेर काढून लाव. तिचं कांहींएक ऐकूं नकोस, जा.

धोंडिबाः—हा पा निघालों. पर हिची बरीक चांगली समजूत करा. उगाच मघापासून माज्याशीं बिघडलिया !

अण्णाः—तूं जा. आतां नाहीं ती बिघडायची. (धोंडी जातो.) खरेपणाचा प्रभावच असा आहे कीं, त्यानं बिघडलेलीं जडतात, वांकडीं असतील तीं सरळ होतात. मात्र यापासनं आमच्या काकूबाईचं कसं होईल ही काळजी आहे. (मनोरमा येते.) कां, काय झालं ?

मनोरमाः—आपलं सर्व ठीक झालं, पण माझ्या आईची मात्र आपण उगीच फजीती केलीत !—त्या चवचाल पोरीनं देवघरांतली रुप्याचीं उपकरणीं वगैरे जें कांहीं थोडं हातीं लागलं तें घेऊन बाजीरावासह पोबारा केला. धोंडी गेलाहि त्यांच्या मागं. पण आईला मात्र अतिशय वाईट वाटून ती एकसारखी मागीलदारीं रडत बसली आहे. कसला मेला गोंधळ हा. भय यांत आपल्याला वाटलं कोण जाणें !

अण्णा—गेलींना ती पोर. जाऊं दे. आपलं सामान कुठं जात नाहीं! मी काढीन त्याचा शोध. हें सर्व अगदीं व्हावयाचं तस्सं झालं. माझ्या खोटेपणानं गोंधळ उडविला खरा, पण खरेपणावर येतांच तो सर्व यथा-स्थित उलगडून गेला. अहाहा! काय सत्याचा महिमा सांगावा! सत्यदेवते; धन्य आहेस तूं! चल, काकूची तेवढी क्षमा मागूं म्हणजे होईल त्यांची समजूत. बाजीरावाला नाहींतरी कमळा नकोच होती. तेव्हां तो त्या पोरी-मागं गेला—आन् जातांना एक मोठी आगळीक करून गेला-तेव्हां आतां तो फिरून इथं येईल याची शंकाच नको!—आमच्या कमळेला तिचं आवडतं माणूस दिलं आहे. तेव्हां येतांक्षणींच तिला चमत्कारिक रीतीनं वागवल्याबद्दल तिची आतां कुरकुर राहिली नाहीं. सर्व प्रकार काशीनं आतां पाहिला आहे तेव्हां तीही धोंडिबाशीं धुसपुस करणार नाहीं. आपण तर आतां शहाजादीच्या रूपानं तसबिरींत बसणार, तेव्हां आपली पण तक्रार मिटलीच म्हणायची. रात्रीं अरेबियननाइट पुस्तक वाचल्यानं हा सारा गोंधळ उडाला म्हणून मीं त्याला नांव ठेवित होतों; पण त्यांतली ही त्रिभुवनसुंदरी शहाजादी आमच्याच घरांत आम्हाला एका कुशल कारागीराच्या दृष्टीनं पहायला मिळाली, तेव्हा तें पुस्तक तर या पुढें आपल्याला अत्यंत प्रिय होणार आहे! शेवटीं खोट्याच्या आधारानें गेल्यास मार्ग अधिकाधिक बिकट होत जातो, पण खऱ्याची कास धरतांच सर्व रस्ता साफ बिनधो-क्याचा असतो हा अनुभव आतां पक्का ठसल्यामुळें सत्यदेवतेचा एकदां जयघोष करून चला आपआपल्या उद्योगाला लागूं. बोला—

"सत्यदेवतेकी जय!"

पात्रें व त्यांचे गुणस्वभाव.

अण्णासाहेबः—एक तरुणवयाचा सुशिक्षित सुखवस्तु गृहस्थ.

रामरावः—त्याचा विद्यालयीन समवयस्क मित्र.

बाजीरावः—अण्णासाहेबांच्या बायकोचा भाऊ. तरुण, छिचोर, व्यसनी, ऐतखाऊ.

धोंडिबाः—आण्णासाहेबांचा गडी. गमत्या स्वभावाचा.

मनोरमाः—आण्णासाहेबांची बायको. फार सुस्वरूप, पण अगदीं साधी.

काकूः—मनोरमेची आई. विधवा, फार बोलभांड, पोक्तवयाची.

कमळाः—अण्णासाहेबांची भाची. तरुण, सुंदर, सुशिक्षित.

काशीः—अण्णासाहेबांच्या घरांतली कुणबीण. तिरसट.

गुलाबः—एक अत्यंत छिचोर, दुर्वर्तनी नाटकी मुलगी.

स्थळः—अण्णासाहेबांचें घर.

वेळः—सकाळीं ६ पासून ९ वाजेपर्यंत.